www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर   निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील   सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 193 वा   शनिवार दि. २९ मार्च २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ४   RNI MAHMAR/2023/89514

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## कुणाल कामराला मोठा दिलासा! ७ एप्रिलपर्यंत अटक टळली, मद्रास हायकोर्टानं दिला अंतरिम जामीन

**मुंबई** - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आक्षेपार्ह गाणे लिहून वादात अडकलेल्या स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराला मद्रास हायकोर्टानं दिलासा दिला आहे. ७ एप्रिलपर्यंत कामराला अटक न करण्याचे आदेश कोर्टाने दिलेत. माझ्या जीवाला धोका असून महाराष्ट्रातील कोर्टासमोर उभा राहू शकत नाही असं कुणाल कामराने त्याच्या याचिकेत म्हटलं होते. त्यातच मुंबईतील खार पोलिसांनी ३१ मार्च रोजी कुणाल कामराला हजर राहण्यासाठी दुसरं समन्स पाठवले आहे.

मद्रास हायकोर्टाने कुणाल कामराला अंतरिम जामीन मंजूर केला आहे. कुणाल कामराला कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करेपर्यंत अटकेपासून संरक्षण दिल्याचं कोर्टाने म्हटलं आहे. शिवसेना आमदार मुरजी पटेल यांनी केलेल्या तक्रारीवरून कुणाल कामराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. कुणाल कामरा याने एकनाथ शिंदेंवर केलेल्या गाण्यामुळे शिवसैनिक संतापले होते. त्यांनी ज्याठिकाणी या शोचं शूटिंग झालं तिथे तोडफोड केली होती.




कुणाल कामरा याने मद्रास हायकोर्टात याचिका दाखल करत अटकेपासून संरक्षण देण्याची मागणी केली होती. त्यात २०२१ पासून मी तामिळनाडूत राहत आहे. मुंबई पोलीस माझ्यावर अटकेची कारवाई करू शकते त्यासाठी अंतरिम जामीन द्यावा असं याचिकेत म्हटलं. त्यावर कोर्टाने ७ एप्रिलपर्यंत कामराला अटकेपासून संरक्षण दिले आहे.

काय आहे वाद?

कॉमेडियन कुणाल कामराने खार येथील युनी कॉन्टिनेंटल हॉटेलच्या द हॅबिटॅट क्लबमध्ये एका शोमध्ये विडंबनात्मक गाण्यातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली होती. कामराचं गाणं व्हायरल होताच शिंदेसेनेच्या शिवसैनिकांनी द हॅबिटॅट क्लबची तोडफोड केली होती. याप्रकरणी कामराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. 'दिल तो पागल है' चित्रपटातील 'भोली सी सूरत आँखों में मस्ती' या गाण्याच्या चालीवर कुणाल कामराने एकनाथ शिंदे यांच्या विडंबनात्मक गाणे लिहिले होते. त्यानंतर हा सगळा वाद झाला.

'कुणाल कामरा कोणत्याही बिळात असला, तरी त्याला बाहेर काढून आपटू'; शिंदेंच्या मंत्र्याचा इशारा

शिंदेंच्या मंत्र्यांनी दिली होती धमकी

कुणाल कामरा वादातून शिंदेसेनेचे मंत्रीही भडकल्याचे पाहायला मिळाले. "पोलिसांची थर्ड डिग्री असते, त्या थर्ड डिग्रीचा वापर त्या कुणाल कामराबाबतीत करावा लागेल. आता आम्ही मंत्री जरी असलो, तरी आम्ही आधी बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघेंचे शिवसैनिक आहोत असं मंत्री शंभुराज देसाई यांनी म्हटलं.

### द • ख • ल

## लायन्स सरगम कराओके स्टार 2025 स्पर्धा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे आयोजित लायन्स सरगम कराओके स्टार 2025 स्पर्धेची अंतिम फेरी गोखले हॉल पनवेल येथे यशस्वीरित्या संपन्न झाली.

एकूण 5 गटात आलेल्या या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीमध्ये 90 पेक्षा जास्त स्पर्धक रायगड, नवी मुंबई, ठाणे आणि मुंबई येथुन सहभागी झाले होते त्यापैकी अंतिम फेरीमध्ये 50 स्पर्धकांची निवड झाली होती. अतिशय चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत खालील स्पर्धकांनी बक्षिसे पटकावली. वयोगट 17 पर्यंत प्रथम क्रमांक - निव कनानी, द्वितीय क्रमांक - तनिषा चव्हाण, उत्तेजनार्थ - आराध्या शिंदे, वयोगट 18 ते 40 प्रथम क्रमांक - करण म्हात्रे, द्वितीय क्रमांक - कल्याणी तुपे, उत्तेजनार्थ - मानसी कदम, वयोगट 41 ते 60 प्रथम क्रमांक - शिवदास नाखवा, द्वितीय क्रमांक - सुबीर गोल्डर , तृतीय क्रमांक - अभिषेक देव, उत्तेजनार्थ - रुपेश कदम आणि कांचन देशमुख, वयोगट 61 पेक्षा जास्त प्रथम क्रमांक - राज गौड, द्वितीय क्रमांक - डॉ. आशिष शेटे, उत्तेजनार्थ - दत्तात्रय ढोले. लायन सभासद प्रथम क्रमांक - किरण बाबरे , द्वितीय क्रमांक - सुरभी पेंडसे. अतिशय चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणुन सुकुमार साखरदांडे आणि मुश्ताक खान यांनी काम पाहिले.

स्पर्धेचे उद्घाटन मोहिनी तनेजा यांनी केले तर सर्व बक्षीस विजेत्यांना प्रमुख पाहुणे प्रथम प्रांतपाल संजीव सुर्यवंशी, अध्यक्ष मानदा पंडित, रिजन चेअरमन सुयोग पेंडसे, झोन चेअरमन अल्केश शहा, मायक्रो कॅबिनेट मेंबर संजय गोडसे तसेच प्रेमेंद्र बहिरा आणि स्वाती गोडसे इत्यादि मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. सहभागी स्पर्धकांचे विनायक पटवे,आशिष शेटे, मानसी कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करुन उत्कृष्ट आयोजनाबद्दल सरगम क्लबचे आभार मानले. सरगम क्लबचा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम यशस्वी होण्यासाठी धवल शहा, ओमकार खेडकर, आदित्य दोशी, सुषमा पन्हाळे, संध्या महानुभाव, महेंद्र लोहार आणि सरगम क्लबच्या सर्व सभासदांनी खूप मेहनत घेतली.



## आ. सुरेश (आण्णा) धस यांच्या वतीने पाटोदा येथे ईफ्तार पार्टी संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** - मुस्लीम समाज बांधवांच्या पवित्र रमजान या सणाच्या निमीत्ताने हिदु, मुस्लीम समाज बांधवांमध्ये एकोपा, बंधुभाव रहावा या साठी आमदार सुरेश (आण्णा) धस हे गेल्या अनेक वर्षांपासुन रोजा इफ्तार पार्टी चे आयोजन करत असतात प्रतिवर्षा प्रमाणे या वर्षी ही गुरुवार दिनांक २७ मार्च रोजी आष्टी/ पाटोदा/ शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या वतीने माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा नगरसेवक सय्यद अब्दुल्ला(आबुशेठ) यांच्या निवासस्थानासमोरील प्रांगणात रोजा ईफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मुस्लीम समाज बांधवाच्या वतीने आमदार सुरेश (आण्णा) धस यांचे शाल, श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. या ईफ्तार पार्टीस पाटोदा तहसीलदार डी.बी.निलावड साहेब, पाटोदा नगर पंचायतचे मुख्याधिकारी जोशी साहेब, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा नगरसेवक सय्यद अब्दुल्ला, आष्टी नगर पंचायतचे नगराध्यक्ष जिया भाई बेग, आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, नगराध्यक्ष राजु भैय्या जाधव, उपनगराध्यक्ष रोहीदास गिते, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष भागवत येवले, प्रसिद्धी व्यापारी दर्शन शेठ कांकरीया, नगरसेवक बालाजी जाधव, महादेव जाधव, संजय शिंदे, विश्वनाथ हुले, पोलीस निरीक्षक जाधव साहेब, माजी सभापती केशवराव रसाळ, तात्यासाहेब हुले,गटनेते बळीराम पोटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील, जुबेर भाई चाऊस, प्रमोद घुमरे, हनुमंत काळे, शरद बामदळे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नय्युम पठाण, **पान २ वर**



## गोखले रोडवरील डबल पार्किंग अडथळाः शिवसेना स्टाईल ॲक्शन!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी, राकेश रमेश पाटील**

दिनांक 27 मार्च, गोखले रोड जवळील शुश्रुक्षा हॉस्पिटल ते पोर्तुगीज चर्च येथे CNG भरण्यासाठी डबल पार्किंग मध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर शिवसेना स्टाईलमध्ये थेट रस्त्यावर उतरून कारवाई दादर BPCL पंपासमोर CNG भरणाऱ्या कॅब्सच्या गर्दीमुळे स्थानिक रहिवासी, आपत्कालीन सेवा वाहने व प्रवाशांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरं जावं लागत आहे. या अनागोंदी ला आळा घालण्यासाठी शिवसेनेचे माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी शिवसेना स्टाईलमध्ये थेट रस्त्यावर उतरून कारवाई केली! वाहतूक कोंडीला जबाबदार CNG पंप प्रशासनावर धडक कारवाई केली. अवाजवी गर्दी करणाऱ्या आणि नियम धाब्यावर बसवणाऱ्या कॅबचालकांना स्पष्ट इशारा दिला



आणि सहकार्य न करणाऱ्या कॅबचालकांच्या गाड्यांची थेट टायर पंचर करण्यात आले. शिवसेनेचा स्पष्ट संदेश...लोकांना त्रास देणारी कोणतीही व्यवस्था खपवून घेतली जाणार नाही! आंदोलनात कुणाल वाडेकर , संतोष तेलवणे , अभिजीत राणे , अजय कुसूम , चेतन राणे , स्वनिल केळशीकर , संकेत पवार व इतर पदाधिकारी उपस्तिथ होते

## माणुसकी जिवंत आहे अजून

### जात-धर्माच्या पलीकडे जाऊन केलेले एक पवित्र कार्य

**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

रमजानचा पवित्र महिना सुरू असताना पुण्यात एक हृदयस्पर्शी घटना घडली, ज्याने पुन्हा एकदा माणुसकीचे जिवंत अस्तित्व सिद्ध केले. पुण्यातील रास्ता पेठ येथे राहणारे 70 वर्षीय सुधीर किंकळे यांचे निधन झाले. त्यांचा कोणीही जवळचा नातेवाईक नव्हता, केवळ त्यांची बहिण जयश्री किंकळे होत्या. त्यांच्या अंत्यसंस्काराची जबाबदारी कोण घेणार, हा मोठा प्रश्न निर्माण झाला. ही माहिती मिळताच पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते जावेद खान यांना त्यांच्या मित्राकडून फोन आला. जावेद खान, जो "उम्मत सामाजिक संस्था" चे अध्यक्ष आहेत, त्यांनी कोणताही विचार न करता तत्काळ मदतीसाठी पुढाकार घेतला. त्यांनी ससून रुग्णालयाच्या **पान २ वर**



## पनवेलमध्ये मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचे नवीन शोरूमचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

पनवेल, २७ मार्च २०२५ रोजी विश्वासार्ह आणि उत्तरदायी सराफ पेढी असलेल्या मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने नवी मुंबईतील पनवेल येथील एमसीसीएच सोसायटीमध्ये त्यांच्या नवीनतम शोरूमच्या उद्घाटनाची आज अभिमानाने घोषणा केली. ३,१४६ चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेल्या नवीन दालनाची रचना ही ग्राहकांना विविध डिझाइन आणि शैलींमध्ये दागिन्यांच्या उत्कृष्ट संग्रहासह जागतिक दर्जाचा खरेदी अनुभव देण्यासाठी केली गेली आहे. हे नवीन दालन म्हणजे अपवादात्मक कारागिरी आणि अतुलनीय सेवा प्रदानतेसह पश्चिम भारतात आपला ठसा वाढवण्याच्या मलाबार ब्रॅण्डच्या वचनबद्धतेतील आणखी एक पुढचे पाऊल आहे. हे शोरूम ब्रँडचे भारताच्या पश्चिम विभागातील ४३ वे विक्री दालन आहे, जे या प्रदेशात त्याची उपस्थिती आणि नेतृत्व आणखी मजबूत करते. नवीन शोरूमचा उद्घाटन समारंभ लोकनेते रामशेठ ठाकूर, व्यवस्थापन पथकाचे सदस्य, मौल्यवान




ग्राहक आणि हितचिंतक यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.यावेळी डायमंड खरेदी करणाऱ्या ५ ग्राहकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या भारत, आखाती देश, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियासह १३ देशांमध्ये ३९० हून अधिक शोरूम्ससह, मलाबार गोल्ड अँड डायमंड्स त्याच्या विस्तृत संग्रह, अपवादात्मक गुणवत्ता आणि ग्राहक-केंद्रित दृष्टिकोनासाठी प्रसिद्ध आहे. आपली उपस्थिती आणखी मजबूत करत, ब्रँड विद्यमान मार्चमध्ये संपूर्ण भारतात १२ नवीन शोरूम उघडण्यास सज्ज झाले आहे, ज्यामुळे प्रीमियम दागिने ग्राहकांसाठी अधिक सुलभ बनवण्याची त्याची वचनबद्धता आणखी दृढ होईल. २६ देशांमधील २२,००० बहुभाषिक कर्मचाऱ्यांच्या समर्पित संघाच्या पाठिंब्याने, ब्रँडने जगभरातील १.५ कोटींहून अधिक समाधानी ग्राहकांना सेवा दिली आहे.

नवीन शोरूममध्ये विविध आवडी आणि प्रसंगांना अनुरूप डिझाइन केलेले सोने, हिरे, प्लॅटिनम, रत्न आणि चांदीच्या दागिन्यांचा विस्तृत संग्रह उपलब्ध आहे. भारताच्या सांस्कृतिक वारशाला प्रतिबिंबित करणाऱ्या पारंपारिक डिझाइनपासून ते आधुनिक साजशृंगारासाठी समकालीन शैलींपर्यंत, विविध पसंतीक्रमांना हे शोरूम पूर्ण करते.

या महत्त्वपूर्ण प्रसंगाचे औचित्य साधून दिलेल्या निवेदनात, मलाबार समूहाचे अध्यक्ष एम. पी. अहमद म्हणाले,पनवेल येथे आमचे शोरूम उघडताना आम्हाला खूप आनंद होत आहे, हे शहर त्याच्या धोरणात्मक स्थान, जलद शहरी विकास आणि समृद्ध सांस्कृतिक वारशासाठी ओळखले जाते. मलाबार गोल्ड अँड डायमंड्समध्ये, आम्ही कालातीत सुंदरतेचा अपवादात्मक कारागिरीशी मिलाफ साधणारे दागिने देण्यासाठी समर्पित आहोत. गुणवत्ता, सचोटी आणि ग्राहकांच्या समाधानावर भर देऊन, आम्ही आमच्या दागिन्यांचे सर्वोत्तम संग्रहण पनवेलमध्ये आणण्यास आणि येथील उत्साही समुदायाला एक अविस्मरणीय खरेदी अनुभव प्रदान करण्यास उत्सुक आहोत. ग्राहकांना परिपूर्ण दागिने निवडण्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी शोरूमची रचना उत्कृष्ट प्रदर्शन सज्जे आणि उच्च प्रशिक्षित संघासह एक परिपूर्ण खरेदी अनुभव प्रदान करण्यासाठी केली आहे. या ऐसपैस जागेचे उद्दिष्ट ग्राहकांना प्रशस्त आतील भाग आणि भरपूर वाहनतळ सुविधेसह एक अद्वितीय दागिने खरेदी अनुभव प्रदान करणे हे आहे. हे शोरूमचे अनावरण जगातील सर्वात पसंतीचे ज्वेलर्स बनण्याच्या, पारंपारिक कारागिरीला आधुनिक नवोपक्रमाशी एकजीव करण्याच्या, तसेच शाश्वतता आणि सामाजिक कल्याणाला प्राधान्य देत कालातीत नमुने तयार करण्याच्या मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या दृष्टिकोनाला उजाळा देणारे आहे.असे मलबार गोल्ड समूहाचे अध्यक्ष एम.पी. अहमद यांनी सांगितले यावेळी मलबार गोल्ड डायमंडचे सदस्य व पनवेल मधील बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बुद्धगयेत सुरू असलेल्या बौद्ध भिक्खूंच्या आंदोलनाला भेट देऊन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंनी दिला जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**सहसंपादक मुकुंद कांबळे**

महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात मिळविण्याचा आठवलेंनी केला निर्धार

**बुद्धगया दि.28 -**
महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बुद्धगयेत भिक्खूंच्या चाललेल्या आंदोलनाला आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी भेट देऊन जाहीर पाठिंबा दिला. महाबोधी टेम्पल ऍक्ट 1949 हा रद्द झाला पाहिजे.महाबोधी महाविहार ट्रस्ट चे चेअरमन सेक्रेटरी आणि सर्व सदस्य बौद्ध असले पाहिजे अशी आपली मागणी असून त्यासाठी बिहार विधानसभेत महाबोधी टेम्पल ऍक्ट रद्द झाला पाहिजे. या मागणी साठी आपण उद्या बिहार चे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि राज्यपाला मा.मोहम्मद आरिफ खान यांची भेट घेणार असल्याचे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले. बुद्धगयेत मागील 45 दिवसापासून सुरू असलेल्या बौद्ध भिक्खूंच्या आंदोलनाला आपण 50 हजार रुपयांची तातडीने मदत देत असल्याचे ना.रामदास आठवले यांनी यावेळी जाहीर केले. महाबोधी महाविहार मुक्तीसाठी भदंत नागार्जुन सुरई सुसाई यांनी आंदोलन केले तेंव्हापासून आपला या आंदोलनाला पाठिंबा आहे.मी बौद्ध आहे .माझा रिपब्लिकन पक्ष हा या आंदोलनात सक्रिय सहभागी आहे. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला बौद्ध धम्माची दीक्षा दिली आहे.महाबोधी महाविहार पूर्णपणे बौद्धांच्या ताब्यात मिळवणारच असा आपला निर्धार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी यावेळी जाहीर केले.यावेळी भदंत प्रज्ञाशील ; भंते आकाश लामा आणि अनेक भंते यावेळी उपस्थित होते.रिपब्लिकन पक्षाचे शिव मिश्रा; विजय गुप्ता आणि मुंबईतून रिपाइं चे जिल्हा अध्यक्ष प्रकाश जाधव; सुबोध भारत आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.



## द • ख • ल

## आमदार राजेश मोरे यांची महाराष्ट्र शासन अंतर्गत डोंबिवलीच्या शिधावाटप च्या दक्षता समितवर निवड...

**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव**

महाराष्ट्र शासन अंतर्गत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत रेशन दुकानांतून वितरण करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंवर देखरेख ठेवण्याकरिता अध्यक्ष, सचिव, सदस्य अशी १२ अशासकीय पद असलेले दक्षता समित्या स्थापन करण्यात आल्या.अशासकीय समितीमध्ये पदाची नेमणूक करण्यात येते अशीच निवड हो आमदार राजेश मोरे यांना अद्यक्ष पदाची जबाबदारी मिळाली आहे शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा रास्त भाव दुकानांतून केला जातो किंवा नाही तपासणे, बनावट, खोट्या शिधापत्रिका व शिधापत्रिका न मिळालेल्या गरजू रहिवासी याबाबत आढावा घेणे, धान्य दुकानातून गैरप्रकारांना आळा घालणे, गावातील प्राप्त तक्रार नोंदवही तपासणे व इतर अशी अनेक कार्ये दक्षता समितीमार्फत पार पाडली जातात.



## तळोजा गुन्ह्यातील जप्त वाहनांचा 29 मार्च रोजी लिलाव

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** तळोजा पोलीस ठाणे गु. रजि. नं. 84/2008,भादवी कलम 407, 34 या गुन्ह्यात जप्त असलेल्या वाहनांचा लिलाव 29/3/2025 रोजी तळोजा पोलीस ठाण्याच्या आवारात होणार असल्याची माहिती तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांनी दिली.
या प्रकरणात दोन टोरेस ट्रक गुन्हे प्रकरणी जप्त झालेले आहेत. दोन्ही ट्रकचा चॅसिस व इंजिन नंबर दिसून येत नाही. या लिलावात भाग घ्यायचा असल्यास तळोजा पोलीस ठाण्याचे व. पो. नी. भगत किंवा पोलीस हवालदार निवळे दूरध्वनी क्र.022-27412333 येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## व्हॉट्सअॅपवर समूहावर मुख्यमंत्र्यांची बदनामी आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांविरोधात पनवेल पोलिसांत गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जुन्या भाषणाचा अर्धवट व्हिडीओ 'आम्ही पनवेलकर' व्हॉट्सअॅप समूहावर प्रसारित करून समाजात दंगे माजविण्याचा प्रयत्न केल्याचा ठपका ठेवून पनवेल शहर पोलिसांनी नाखवा अबू बकर या नावाने प्रोफाईल असलेल्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात व्हिडिओ व्हॉट्सअप ग्रुपवर पोस्ट केल्याने भाजप युवा कार्यकर्ते देवांशू संतोष प्रभाळे (रा. समर्थ कृपा बिल्डिंग, पनवेल) यांनी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आम्ही पनवेलकर या व्हॉट्सप ग्रुपवर मुख्यमंत्र्यांच्या भाषणाचा आणि समाजामध्ये द्वेषाची भावना आणि गटातटात दंगलीची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा व्हिडीओ पोस्ट केला. आणि त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र अशा भावना व्यक्त झाल्या. त्या अनुषंगाने या प्रकरणी नाखवा अबू बकर (व्हॉट्सअॅप क्रमांक ९६९९१५१३९०) आणि एका महिलेविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. समाजात अफवा पसरविणे, शांतता भंग केल्याचा गुन्हा नोंदवला असून वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक अभय कदम हे तपास करीत आहेत. पोलिसांनी या प्रकरणी अधिक तपास सुरू केला असून संबंधित आरोपींचा शोध घेत आहेत.

## आ. सुरेश (आण्णा) धस यांच्या वतीने पाटोदा येथे ईफ्तार पार्टी संपन्न.

**पान १ वरून** संतोष लवांडे (फिटर), इंजिनियर ज्ञानदेव मिसाळ, विठ्ठल रुपनर,, राजाभाऊ येवले, संतोष ( दादा) जाधव, अँड. जब्बार पठाण, अँड.सय्यद अशरफ, संदीप जावळे, कल्याणराव भोसले, आसीफ सौदागर, सय्यद शहानवाज सर, सुभाष पाखरे, सय्यद शहाबाज, सय्यद आदम, संदीप जाधव, पत्रकार विजय जाधव, पत्रकार हमीदखान पठाण, पत्रकार शेख जावेद, शेख जहीर भाई, शेख आसिफ, सय्यद शफ्फु शेठ, सय्यद मुसा, सय्यद साजेद, यांच्या सह अनेक हिंदु मुस्लीम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थीत होते. या वेळी सय्यद परिवाराच्या वतीने उपस्थित समाज बांधवांचे सत्कार करण्यात आले.

# पीएनजीचे पोल्मी, प्रथा, कथा, सप्तम, इना हे लोकप्रिय कलेक्शान सादर

## खास कलेक्शन्ससह पीएनजी सोबत साजरा करा गुढीपाडवा !

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**

**मुंबई,** २८ मार्च २०२५ : महाराष्ट्रातील सर्वात विश्वासार्ह ब्रॅंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएनजी ज्वेलर्सने नववर्षाच्या निमित्ताने आपले खास कलेक्शन सादर केले आहेत, ज्यात पोल्मी, प्रथा, कथा, सप्तम आणि इना या कलेक्शन्सचा समावेश आहे. गुढीपाडव्याच्या निमित्ताने २४ मार्च ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान सर्व पीएनजी ज्वेलर्सच्या स्टोरमध्ये ग्राहकांसाठी आकर्षित सवलती दिल्या जाणार आहेत. गुढीपाडवा हा नवीन वर्षाची आणि समृद्धतेची सुरुवात मानला जातो. या शुभप्रसंगी पीएनजी ज्वेलर्सच्या मोहिमेत पारंपरिक आणि आधुनिक अशा दोन्ही प्रकारातील सोने, चांदी, हीरे, आणि प्लॅटिनमच्या दागिन्यांवर खास सवलती देण्यात आल्या आहेत. लग्नसराई सारख्या महत्वाच्या प्रसंगांसाठी, सणासुदीला भेटवस्तू देण्यासाठी, वैयक्तिक सौंदर्यासाठी या किंवा सोन्यात गुंतवणूक करण्यासाठी ही एक उत्तम संधी आहे. गुढीपाडवा मोहिमेसाठी सादर करण्यात आलेलं मुख्य कलेक्शन म्हणजे पोल्मी, पारंपरिक पोल्की (अनकट) हीरे, पुरातन कारागिरी यांचा संगम असलेले दागिने हे राजेशाही सौंदर्य आणि आधुनिक आकर्षण यांचे प्रतीक आहे. या कलेक्शन मधील प्रत्येक दागिना हा राजेशाही देखावा प्रदान करत असून सर्वांना परवडणारा तसेच



प्रत्येक स्त्रीला तिचे सौंदर्य जपण्याची संधी प्रदान करणार आहे.
डॉ सौरभ गाडगीळ, व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष, पीएनजी ज्वेलर्स यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली,"सोन्याच्या किंमती उच्चानकी पातळीवर पोहचत असून देखील ग्राहक त्याच उत्साहाने खरेदी करत आहेत. ग्राहक जुने सोने बदलून नवीन दागिने खरेदी करत आहेत, जेणेकरून त्यांना आर्थिक स्थिरता मिळते तसेच सणासुदी किंवा लग्नसराईच्या दागिन्यांची देखील खरेदी होते. गुढीपाडवा हे नव्या वर्षाची सुरुवात असल्याने पारंपरिक आणि स्टडेड दागिन्यांना अधिक महत्व दिले जाते. तसेच सध्या सुरू असलेली महाराष्ट्रीय लग्नसराईमुळे ही मागणी आणखी वाढवत आहे. भारतात सोनं हे फक्त किंमतीवर नाही तर भावनिक आणि शुभ प्रसंगी खरेदी केलं जातं. त्यामुळे यंदाचा गुढीपाडवा सर्वांसाठी तेजस्वी आणि उत्साही असेल असा आमचा विश्वास आहे." या गुढीपाडव्याला खास बनवण्यासाठी पीएनजी ज्वेलर्स ने जुन्या सोन्याच्या बदल्यावर ०% कपात, सोन्याच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेसमध्ये ३०% पर्यंत सूट आणि हिऱ्यांच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेसमध्ये १००% पर्यंत सूट दिली आहे. या नववर्षाला आणखी आनंदमय करण्यासाठी आजच आपल्या जवळच्या पीएनजी ज्वेलर्स स्टोअरला किंवा पीएनजी ज्वेलर्सच्या ऑनलाइन वेबसाईटला भेट द्या!

# सिल्लोड तालुक्यातील शिंदेफळ येथील नवनाथांपैकी एक असणाऱ्या कानिफनाथ महाराजांच्या यात्रोत्सवाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील शिंदेफळ येथील नवनाथांपैकी एक असणारऱ्या कानिफनाथ महाराजांच्या यात्रोत्सवाला शनिवारी ता.२९ पासून सुरू होत आहे पुढील तीन दिवस ही यात्रा चालणार आहे ग्रामपंचायतीच्या वतीने यात्रोत्सवाची संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. या यात्रेला अनेक वर्षांची परंपरा लाभली असून ही यात्रा दर गुढीपाडव्याच्या आदल्या दिवसापासून सुरू होते आणि गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी संपते. पहिल्या दिवशी संदल आणि तमाशा असतो. संदल हा पारंपरिक पद्धतीने

## यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणून संदल दशावतारी सोंग, लोकनृत्य तमाशा, दारुगोळा.

वाजत गाजत नाथांच्या मंदिरात नेला जातो. संदलच्या ताटामध्ये मलीदा असतो, गहू ज्वारी बाजरी यापासून तयार झालेली चपाती, भाकरी बारीक चुरून त्यात गुळ आणि गावरान तूप एकत्र करून मलीदा तयार केला जातो. पांच कणकेचे दिवे, गलप, उद, देवाला घालायला फुलांची माळ, गंध गोळ, अगरबत्ती यांपासून मलीद्याचे ताट सजवले जाते.

संदलच्या दिवशी तमाशा रात्री नऊ वाजल्यापासून सकाळी सहा वाजेपर्यंत असतो.. मुख्य यात्रेचा दिवस म्हणजे गुढीपाडवा. या दिवशी सकाळी मारोती ला शेंदूर लावण्याचा कार्यक्रम होतो.दुपारनंतर सर्व जाती- धर्मांच्या लोकांचे संदल(मलीदे) कानिफनाथाला प्रसाद म्हणून देतात. दिवसभर भक्तांची रेलचेल यांनी यात्रा सजते. सहा वाजेला तगातराव निघतो. रात्री आठ वाजता मारुतीला घागर पुजली जाते आणि नंतर महाआरती होते. नंतर रामकाठी आणि फटाक्यांची आतिषबाजी (दारूगोळा) संपन्न होते.
साडेदहा ते अकरा च्या दरम्यान सोंगाना सुरुवात होते. गणपती,शारदा, मारुती, महादेव पर्वती, बाळंतीण, तंट्या भिल, चंद्र, मच्छी, विश्वकर्मा, दत्त, आगे तळ, डाकिन, राम-लक्ष्मण रावन, नंदी, घोडा, एकादशी, द्वादशी, अस्वल, देवीचे सोंग इत्यादी वाद्याच्या(हलगीच्या)(स्थानिक भाषेत डफडं)विशिष्ट चालीवर नृत्य करून वेगवेगळ्या प्रकारे आलेल्या लोकांचे मनोरंजन करतात. तीसऱ्या दिवशी जंगी कुस्त्यांचा आखाडा असतो, वस्तूंच्या खरेदी विक्रीसाठी विविध प्रकारचे दुकाने,खाद्यपदार्थांच्या स्टॉल इत्यादी गोष्टींचा समावेश असतो. अशाप्रकारे यात्रेचा शेवट होतो.

गावची यात्रा पंचकृषीत आणि तालुक्यातील मोठी यात्रा आहे. तीनं दिवसांच्या या यात्रेत अनेक कार्यक्रम असतात. तमाशा प्रेमींसाठी ही यात्रा खास असते, तसेच दशावतारी सोंग ही गावची नवी ओळख होऊ पाहत आहे. यात्रा नियोजनात कानिफनाथ ग्रुपची मोठी मदत लाभते. गावकऱ्यांच्या वतीने यात्रेला येणाऱ्या भाविकांचे स्वागत करतो.

**संदिप डंगारे**
**पोलीस पाटील**

यात्रेची संपूर्ण तयारी ग्राम प्रशासनाच्या वतीने झाली आहे.
यात्रेला सर्व जाती- धर्मांचे लोक येतात, यात्रेनिमित्त गावात उत्साहाचे वातावरण असते. सगळे धार्मिक विधी वेळेत होण्यासाठी नियोजन केले आहे. काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचाही बंदोबस्त करण्यात आला आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने यात्रेला यावे अशी विनंती.

**सरपंच रेखा अनिल अक्कलकर**

## माणुसकी जिवंत आहे अजून

**पान १ वरून** डेड हाऊसमध्ये जाऊन संपूर्ण माहिती घेतली. तिथे पोलीस हवालदार होळकर आणि जयश्री किंकळे उपस्थित होते. पंचनामा सुरू असल्यामुळे मृतदेह रात्री उशिरा मिळणार होता.
जयश्री किंकळे यांनी आपल्या भावाच्या अंत्यसंस्कारासाठी सकाळपर्यंत थांबण्याची विनंती केली, कारण सूर्यास्तानंतर विधी करणे त्यांच्या धार्मिक परंपरेनुसार शक्य नव्हते. ही विनंती ऐकून जावेद खान यांना मनात विचार आला – रमजानच्या या पवित्र काळात, त्यांच्या दृष्टीनेही दुसऱ्या दिवशी मोठा धार्मिक दिवस होता. पण माणुसकीला प्राधान्य देत त्यांनी धर्म, जात बाजूला ठेवून या कार्याला अधिक महत्त्व दिले. सकाळी लवकरच शुभम आणि शेरू या त्यांच्या साथीदारांना ससून रुग्णालयात पाठवले. त्यांच्यासोबत आणखी एका शुभमची मदत मिळाली. मायकल साठे देखील वैकुंठ स्मशानभूमीत पोहोचले. शेवटी, जावेद खान व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुधीर किंकळे यांचे नातेवाईक बनून त्यांचा अंत्यसंस्कार संपूर्ण सन्मानाने पार पाडला. ही घटना म्हणजे माणुसकीच्या भावनेचा सर्वोत्तम आदर्श आहे. जावेद खान आणि त्यांच्या टीमने दाखवलेली संवेदनशीलता आणि कृतज्ञता ही समाजासाठी प्रेरणादायी आहे. जात, धर्म, परंपरा यापलीकडे जाऊन माणसाने माणसासाठी उभे राहणे – याच्यापेक्षा मोठी मानवता कोणती?
"उम्मत सामाजिक संस्था" च्या कार्याने समाजात माणुसकीचे पक्के बंध निर्माण होतात. जावेद खान आणि त्यांच्या टीमला या उदात्त कार्यासाठी सलाम!

# मोठया संख्येने महाविद्यालयातील सतरा विद्यार्थ्यांची एकाच वेळेस पोलीस व सैन्य दलात निवड

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड च्या ऐतिहासिक घटनेत प्रथमच, एकाच वेळी 17 विद्यार्थ्यांची महाराष्ट्र पोलीस व भारतीय सैन्य दलात निवड होऊन भरती झाल्याचा सुवर्णयोग घडून आला आहे. महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील एनसीसी मधील कॅडेट्स व क्रीडा विभागातील खेळाडू यांनी मोठ्या प्रमाणात शासकीय सेवेत यशस्वीपणे बाजी मारत नोकरीची संधी मिळवली आहे. म्हणूनच निफाड महाविद्यालयाचे पालकत्व स्वीकारलेले मविप्र समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. (डॉ.)




**पोलीस व सैन्य दलात निवड झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार... मविप्र समाजाचे सभापती बाळासाहेबजी क्षीरसागर यांच्या शुभहस्ते करण्यात आला... समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव व सर्व प्राध्यापक वृंद**

सुरेश जाधव यांच्या हस्ते नोकरीत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा यथोचित स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी सभापती क्षीरसागर म्हणाले की, खऱ्या अर्थाने शिक्षणाचा हेतू व उद्देश म्हणजे विद्यार्थ्याला स्वतःच्या पायावर उभे करून त्यांच्यासोबतच त्याच्या कुटुंबाला देखील आर्थिक पाठबळ निर्माण होऊन जीवनमान उंचावणे होय. हा हेतू खऱ्या अर्थाने सार्थ करण्याचे अविरत कार्य निफाड महाविद्यालय व त्यातील सर्व घटक करत आहेत. 1971 साली स्थापना झालेल्या महाविद्यालयाचा वेलू मविप्र कर्मवीरांच्या तत्व आणि आदर्शांवर निसंकोचपणे गगनात यशस्वीपणे झेपावतो आहे. निफाड महाविद्यालय शिक्षण, संस्कार, आधुनिकता, समाजकार्य, रोजगार निर्मिती, पर्यावरण जनजागृती, कला, क्रीडा व सर्वसमावेशक कार्य व उपक्रमातून आपला ठसा प्रत्येक क्षेत्रात यशस्वी विद्यार्थ्यांच्या रूपाने उमटवत आहे. त्यातच 17 विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत झालेली निवड ही बाब निफाड ग्रामस्थांच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी ठरली असून त्याबद्दल प्राचार्य डॉ. सुरेश जाधव आणि सर्व घटकांचे त्यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. नोकरीत निवड झालेल्या अनुक्रमे गायकवाड प्रल्हाद,हिलाल प्रमोद,पवार निरंजन,शिंदे धनंजय,कासव किरण,वाळके अनिकेत,सोमवंशी अनिकेत,ताडगे प्रथमेश,मोगरे अभिराज,खिरे शुभम,पिंजारी यास्मिन, सानप सिद्धार्थ,घोलप वैभव,शिरसाट आदित्य,कडाळे चेतन,यादव पियुषकुमार,कादरी रोशनी या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल म. वि. प्र. समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस अड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, संचालक शिवाजी आप्पा गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई बोरस्ते, डॉ. उत्तमराव डेरले, निफाड महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव, सर्व सभासद, हितचिंतक, सर्व प्राध्यापक वृंद आणि आप्तेष्ट नातेवाईक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# जिल्हा रुग्णालयातील पाण्यात अळ्या आणि माती; जिल्हा रुग्णातील कर्मचाऱ्यांचा बेजवाबदारपणा

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना स्वच्छ पाणी मिळावे यासाठी पिण्याच्या पाण्याच्या फिल्टरची व्यवस्था करण्यात आली आहे. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या कामात बेफिकीरपणामुळे अलिबाग शहरातील जिल्हा रुग्णालयात पिण्याच्या पाण्याच्या फिल्टरमध्ये माती आणि अळ्या आढळल्याने रुग्ण आणि रुग्णांचे नातेवाईक तसेच रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांचेही आरोग्य धोक्यात आले आहे. अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या बाह्य रुग्ण आणि आंतर रुग्ण तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना स्वच्छ पाणी मिळावे यासाठी फिल्टरची व्यवस्था प्रत्येक ठिकाणी करण्यात आलेली आहे. यातील आंतर रुग्ण इमारतीमध्ये असणाऱ्या फिल्टरमध्ये मातीसह अळ्या आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. तसेच नवजात शिशू यांच्या विभागात असणाऱ्या फिल्टरमध्येही काही प्रमाणात माती आढळून आली आहे.या फिल्टरची पाहणी करत असताना तेथील रुग्ण आणि नातेवाईकांनी या पाण्याला विशिष्ट प्रकारचा वास येत असल्याची तक्रार केली. हे पाणी आम्ही किंवा माता यांना दिल्यास उलट्या, जुलाबाची बाधा होऊ शकते, याकडे त्यांनी लक्ष वेधले.






रुग्णालय हे औषधोपचार, रुग्ण बरे होण्यासाठी आहे की आजार प्रसारासाठी, असा सवालही त्यांनी केला. पाण्याला येणाऱ्या वासाबद्दल येथील कर्मचाऱ्यांकडे तक्रार करूनही त्याकडे लक्ष दिले जात नसल्याचे रुग्णांकडून सांगण्यात आले.

रुग्ण, नातेवाईकांच्या आरोग्याबाबत पूर्णपणे हरगर्जीपणा रात्री साडेअकराच्या सुमारास एका रुग्णाच्या नातेवाईकाने फोन करून बोलावले. येथील आंतररुग्ण विभागातील अतिदक्षता विभागा बाहेरील फिल्टरमधून बाटलीत पाणी घेतल्यावर त्यात किडे आणि माती दिसली. याची खातरजमा करण्यासाठी रुग्णालयात गेलो तेव्हा पाण्याच्या बाटलीत काही किडे आणि तळाशी माती दिसली. ही बेफिकीरी आहे.
**– सागर पेरेकर, सामाजिक कार्यकर्ते, अलिबाग**

जिल्हा रुग्णालयातील फिल्टरची त्वरित स्वच्छता करून घेतली जाईल. काही ठिकाणी फिल्टर खराब झाले असतील ते बदलण्यात येतील. शिवाय दोन दिवसाआड सर्व फिल्टरची तपासणी करण्याच्या सूचना संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना देण्यात येतील.
**डॉ. निशिकांत पाटील**
**प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक**

## आपल्या सर्वांच्या सहकार्यातून कवळे गुरुजींनी उभारलेल्या 3 युनिटच्या ऊस गाळपातुन शेतकऱ्यांच्या खिशात 150 कोटी रुपये केवळ ऊस बिलाची रक्कम.

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -** हंगाम 2024-25 च्या कालावधीत 6 लाख 16 हजार 750 मेट्रिक टन ऊस गाळप....
कवळे गुरुजी, यांनी नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यात 3 कारखाने दूध डेअरी, 20 पतसंस्थेच्या शाखा उभारून फुलवलेल्या या माळरानावरच्या नंदनवणात लाखो शेतकरी सुखी संपन्न झाले, येथूनच हजारो कुटुंबियांचा संसार थाटण्याचं काम या देवरुपी माणसान केलय हे कोणी नाकारू शकत नाही.
शेतकऱ्यांसाठी साम्राज्य उभे करण्यासाठी हिंमत लागते तेच व्यक्ती जिगरबाज असतो कवळे गुरुजी, म्हटले की निष्कलंक चारित्र्य संपन्न चांगलें विचार दुसऱ्यांना सामर्थ्य निर्माण करून यशाचा पाऊल खुणा दाखवणारा असा कवळे गुरुजी होय.सिंधी गावच्या च्या खडकाळ जमिनीवर सहा महिन्यात कारखाना उभारून परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्यायदेण्याचे काम कवळे गुरुजी, ने केले आहे हे



परिसरातील शेतकऱ्यांना नाकारता येत नाही उघड्या डोळ्याने जिल्हा पाहतोय.एवढेच नाही.13 महिन्याचे ऊसपीक असल्याने शेतकऱ्यांना शेती जोडव्यवसाय दुग्धव्यवसाय यास इतर कोणत्याही व्यवसायाला प्राधान्य देत आपल्याच पतसंस्थेतून अल्प दरात कर्ज वाटप करून अनेकांना व्यवसायाची संकल्पना दिली. याही पुढे चार कारखान्याचा ऊस दहा हजार गाळप झाला पाहिजे असे नियोजन बध काम युध्दपातळीवर चालू आहे. या जिल्ह्यात अशा देरूपी माणसाचा जन्म झालाय.हे आपलं परम भाग्यच म्हणावं लागेल. अनेक व्यक्ती या माणसाला राजकारणातून विरोध करतात पण खरं पाहिलं तर राजकारण करावं पण तत्वाचं आणि विकासाच कराव तरच आपला विकास आणि आपल्या कुटुंबियांचा विकास निश्चित झाल्याशिवाय राहत नाही हे कवळे गुरुजीचे विचार नेहमी आत्मसात केले पाहिजे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द • ख • ल

## लॅपटॉप चोरला

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

लॅपटॉपच्या बॅगेतून लॅपटॉप चोरल्या प्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 23 मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. देवश्री गजरे या खारघर, सेक्टर 40 येथे राहत असून त्यांनी लॅपटॉप विकत घेतला होता. त्या उलवेच्या घरी राहण्यासाठी निघून गेल्या. त्यांनी बेडरूम मधील कपाटाच्या शेजारी बॅगमध्ये लॅपटॉप ठेवला. 20 मार्च रोजी त्या खारघर येथील घरी आल्या आणि 21 मार्च रोजी त्यांनी लॅपटॉप बॅग तपासली असता त्यात लॅपटॉप, माऊस आणि चार्जर मिळाला नाही.

=============

## स्कुटी पार्क करून कामाला गेले, चोराने स्कुटी पळवली

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: स्कुटी पार्क करून प्रसाद मिस्त्री कामाला गेले आणि चोराने स्कुटी पळवल्याची घटना पनवेल रेल्वे स्टेशन येथे घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

शिरढोण येथे राहणारे प्रसाद मिस्त्री हे 20 मार्च रोजी एमएच 03 इए ०७२६ ही पनवेल रेल्वे स्टेशन जवळ असलेल्या साईबाबा मंदिराचे शेजारी रस्त्याच्या कडेला पार्क करून नोकरीच्या ठिकाणी गेले. ते सायंकाळी गाडी पार्क केलेल्या ठिकाणी आले असता स्कुटी सापडून आली नाही. चोरट्याने ती चोरून नेली.

================

## मारहाण प्रकरणी पाच जणां विरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

मारहाण केल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अजीमुल्ला शेख हे कच्ची मोहल्ला पनवेल येथे राहत असून अदनान अन्सारी आणि फैजान अन्सारी यांनी त्याला बघून चोर चालला आहे, पोलिसांचा खबरी आहे असा जोर जोरात आवाज दिला. त्याचा विचारणा करण्यासाठी गेला असता त्याला मारहाण केली आणि त्याला धमकी दिली. त्यानंतर अजीम अन्सारी याने चाकू सारखे हत्यार फेकले ते त्यांच्या पायाच्या मांडीला लागले. त्यानंतर त्यांची पत्नी तिच्यासोबत भांडण केले. याचा जाब विचारला असता इमरान अन्सारी आणि मेहमूदा यांनी मारहाण केली आणि गळ्यातील सोन्याची चैन तोडून नुकसान केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अदनान अन्सारी, फैजान अन्सारी, अजीम अन्सारी, इमरान अन्सारी, मेहमूदा यांच्या विरोधात 21 मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

## जाचकवस्ती ग्रामपंचायतीची निवडणूक होणार रंगतदार..

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

जाचकवस्ती ता. इंदापूर ग्रामपंचायतचे माजी सदस्य प्रकाश मल्हारी नेवसे यांनी आपल्या ग्रामपंचायत सदस्य पदाचा राजीनामा मागील काही महिन्यापूर्वी दिला होता.त्यामुळे त्या जागेचा पोटनिवडणूक कार्यक्रम लवकरच जाहीर होणार असल्याची माहिती समोर आली आहे. मागील वेळी जाचकवस्ती ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध करण्यात आली होती.त्यावेळी ठरल्याप्रमाने प्रकाश नेवसे यांना सदस्य व नंतर उपसरपंच पदी निवड करण्यात आली होती. नंतर आपल्या उर्वरित कार्यकालाचा राजीनामा दिला असल्यामुळे ही निवडणूक लागली आहे. प्रकाश नेवसे यांची इतर मागास पुरुष प्रवर्ग मधून प्रतिनिधी म्हणून बिनविरोध करण्यात आली होती.पण आताच्या होणाऱ्या पोटनिवडणूकी साठी हे पद सर्वसाधारण पुरुष यांची सोडत निघाल्यामुळे निवडणूक रंगात आली आहे.यासाठी जाचकवस्ती गावातील युवा वर्ग यांनी आपली ग्रामपंचायत सदस्य पदी निवड व्हावी म्हणून तयारी चालू केली असून जाचकवस्ती मधील नेते मंडळी कडे यांच्या गाठी भेटी घेत असल्याचे दिसत आहे.

## शिवसेना प्रणित ग्राहक संरक्षण कक्षाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी घेतली माजी आ. मनोहरशेठ भोईर यांची सदिच्छा भेट

**दैनिक युवकआधार**
**उरण/सायली साळूके**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या ग्राहक संरक्षण कक्षाचे रायगड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची नियुक्त्या शिवसेना नेते श्री अनिलजी देसाई साहेब यांनी नुकत्याच जाहीर केल्या आहेत, यामध्ये उरण तालुका ग्राहक संरक्षण कक्षाच्या *तालुका संघटक पदी श्री ओमकार घरत* यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे तर *उरण शहर संघटक पदी श्री संदीप जाधव* यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी शिवसेना *जिल्हाप्रमुख व उरणचे मा आमदार श्री मनोहरशेठ भोईर* यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले यावेळी मनोहरशेठ भोईर यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



# उरणकरांनो पाणी जपून वापरा.

### रानसई धरणात ३० जून पर्यंतच पाणीसाठा शिल्लक.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील वाढते औद्योगिकीकरण,विस्तारीकरण ग्रामपंचायती सोबतच सिडको वसाहतीची निर्मिती, नवनवीन वसाहतींची वाढ परंतु मिळणाऱ्या पाणीसाठा जो पूर्वीपासूनचा आहे तोच आहे. वस्ती वाढत आहे आणि पाणीसाठा कमी पडत आहे. उरण तालुक्यातील २६ ग्रामपंचायतीना पिण्याचे पाणी पुरवणाऱ्या रानसही धरणाची पातळी ३०जून पर्यंत पुरेल इतकाच धरणात पाणीसाठा आहे. तालुक्यातील पावणे दोन लाख लोकसंख्येच्या२६ ग्रामपंचायतींना पिण्याचे पाणी रानसही धरणातून पुरवले जाते. परंतु आता या रानसही धरणाची पाण्याची पातळी प्रचंड प्रमाणात खालवली आहे उरण तालुक्यातील नागरिकांना आता आठवड्यातील दोन दिवस पाणी कपाती बरोबरच पाणीटंचाईला ही सामोरे जाण्याची वेळ येऊन ठेपणार आहे. २६ ग्रामपंचायतींना रानसई धरणातून पाणीपुरवठा केला जातो मात्र फेब्रुवारी मार्च महिन्याच्या अगोदरच तालुक्यातील अनेक गावांना पाणीटंचाईने ग्रासले आहे. करंजा गावातील नागरिकांना तर पाण्यासाठी १२ ते १५ दिवस वाट पहावी लागते.१७ हजार लोकसंख्या असलेल्या केगाव ग्रामपंचायतीतील गावांनाही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. अनेक आदिवासी वाड्यातही पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावली असल्यामुळे या वाड्या वस्त्या देखील तहानलेल्या आहेत. त्यांच्या परिसरात असलेल्या विहिरी,तलाव, बोअरवेल यांनी तळ गाठले आहे. मिळेल तिथून पाणी आणण्याची वेळ महिलांवर आली आहे. त्यामुळे काही गावात याआधी दोन-तीन दिवसावर पाणी मिळायचे ते आता आठ दहा दिवसानंतरही मिळणार नाही असे झाले आहे. करंजा केगाव मध्ये पंधरा दिवस पाण्याची आणीबाणी आहे पाणीटंचाईमुळे घरगुती पिण्याच्या पाण्याचा पाणीसाठा ही पाण्यासाठी महागडे मिनरल वॉटर आणावे लागते. दिवसाला तो खर्च १००ते १५०रुपये पाण्यासाठी होत आहेत. गरीब गरजूं पाण्यावरील एवढा खर्च कसा करणार? करंजा केगाव मध्ये पंधरा पंधरा दिवस पाणी मिळत नाही, पणआता करंजा नाही तर आता इतर गावांनाही पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. लग्नसराई किंवा इतर कार्यक्रमाच्या वेळेला देखील मिनरल वॉटर च्या पाण्याच्या खर्चाची भर पडत आहे.



# रमझानच्या पवित्र महिन्यात अमरीन मुखरी व त्यांच्या परिवाराकडुन गरीब गरजूंनाधान्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**उरण/सायली साळुंके**

. सध्या रमझानचा पवित्र महिना सुरु असून मुस्लीम समाज्यात रोजा धरणे हे मुस्लीम बांधवांचे कर्तव्य आहे. मुस्लीम कालगणनेच्या महिन्यांतील 9 वा महिना रमझान असून तो महिना अत्यंत पवित्र महिना आहे. या महिन्यात रोजे धरले जातात रमझान महिन्यात मुस्लीम बांधव मोठया प्रमाणात दानधर्म करतात भाईचारा पाळतात. आणि शव्बात या 10 व्या महिन्याचा पहिला दिवस म्हणजेच रमजान इदीचा दिवससाजरा केला जातो.यामहिन्यात दानधर्म करण्याची मोठी प्रथा आहे. अमरीन मुक्री या उरण तालुक्यांतील मुस्लीम समाज्यामधील सामाजिक कार्यकर्त्या असून गेली 33 वर्षे त्या सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत.त्यां नचुकता दरवर्षी या महिन्यात गरीब गरजूंना मदत करीत असतात आत्तापर्यंत त्यांनी अनेक गरजूंना मदत केली आहे. या संदर्भात अमरीन मुक्रीना आमच्या प्रतीनिधिनी विचारले असता त्या म्हणतात मी उरणमध्ये राहात असून या महिन्यात दरवर्षी आमच्या परिवाराच्या आणि देणगीदारांच्या मदतीने मी गरजूंना मोठयाप्रमाणात दानधर्म करीत असते यंदाही 500 पेक्षा अधिक गरजूंना मी अनधान्य व इतर गोष्टींची मदत केली आहे.

. . त्यामुळे मलाव माझ्या परिवाराला मानसिक समाधान आणि आनंद मिळतो आणि गरीब गरजूंना त्याचा लाभ मिळतो आणि त्यांची ही गरज भागली जाते. रोजे धरले जातात त्यावेळी काही लोक विश्रांती घेणे पसंद करतात त्यावेळी मी गरजूंच्या सेवेत व त्यांना मदत करण्यात माझा वेळ घालवीत असते माझ्या या सेवेत माझा सारा परिवार माझे पती,मुले,नातवंडे मला सहकार्य करतात त्यामुळे त्यांच्या मनावरही सेवा करण्याचा संस्कार निर्माण होत असतो रमझानच्या पवित्र महिन्यात आमच्या परिवाराकडून सेवा कार्य घडत असल्याने माझ्या परिवारालाही आनंद मिळत असतो.आशय त्या शेवटी म्हणाल्या




# फुंडे विद्यालयाचे प्राचार्य एम.जी. म्हात्रे यांचा सेवापूर्ती सोहळा !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथील प्राचार्य एम. जी. म्हात्रे सर आपल्या ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा सेवापुर्ती सोहळा शुक्रवार दिनांक २८ मार्च २०२५ रोजी साजरा करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी सत्कारमूर्ती प्राचार्य एम. जी.म्हात्रे सर,त्यांच्या सुविद्य पत्नी बी. एम.म्हात्रे मॅडम, विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू साहेब, उपमुख्याध्यापिका थोरात एस.डी मॅडम, पर्यवेक्षिका बाबर एस.एम. मॅडम व पाटील एस. एस.मॅडम, तसेच स्थानिक स्कूल कमिटी स्थानिक स्कूल कमिटी सदस्य सुरेश म्हात्रे ,राजेंद्र ठाकूर,योगेश पाटील,विश्वास तांडेल,काका कडू, सत्कार मूर्तीचे मोठे बंधू जयराम म्हात्रे, मोठ्या वहिनी प्रिती म्हात्रे, सासरे लक्ष्मण म्हात्रे, मोठा मुलगा राजस म्हात्रे, सुनबाई स्नेहा म्हात्रे, छोटा मुलगा हर्षित म्हात्रे, विद्यालयाचे माजी कार्यालय प्रमुख एम पी तुमडे, जासई शाखेचे उपमुख्याध्यापक व्ही के कुटे, पर्यवेक्षिका मुकादम के एस. उपस्थित होते. विद्यार्थिनींनी सुंदर अस रयत गीत आणि स्वागतगीत सादर केलं.या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका साधना पाटील मॅडम यांनी केले. प्रास्ताविकेमधून प्राचार्य साहेबांचा संपूर्ण सेवेचा प्रवास त्यांनी सविस्तरपणे सांगितला. विद्यार्थिनी मनोगतात कुमारी श्रावणी कोळी प्राचार्य सरांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तर शिक्षक मनोगतात प्राध्यापक उगले सर, प्रा. दिनेश सासवडे व शेळके आर.जी. सर यांनीही सरांच्या शैक्षणिक कार्याची माहिती सांगितली. जासई शाखेचे उपमुख्याध्यापक व्ही के कुटे सर,माजी कार्यालय प्रमुख तुमडे सर,स्थानिक स्कुल कमिटी सदस्य योगेश पाटील,सुरेश म्हात्रे, राजेंद्र ठाकूर, विश्वास तांडेल,सरांचे जेष्ठ बंधू जयराम म्हात्रे, सरांच्या पत्नी बी. एम. म्हात्रे , सूनबाई स्नेहा म्हात्रे या सर्वांनी यांनी आपल्या मनोगतातून प्राचार्य सरांना सेवापूर्तीच्या शुभेच्छा दिल्या. नंतर विद्यालयाच्या वतीने प्राचार्य एम.जी. म्हात्रे सर व त्यांच्या पत्नी बी एम म्हात्रे असा सपत्नीक सत्कार पूर्ण पोशाख आणि सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. तसेच रयत शिक्षण संस्था सातारा यांच्यावतीने दिले जाणारे सन्मान चिन्ह देऊन देखील सत्कार करण्यात आला. उलवे शाखेचे मुख्याध्यापक भरणूके डी डी सरांनी शब्दांकित केलेल्या मानपत्राचे वाचन शेळके सरांनी केले. यानंतर या सत्काराला उत्तर देत असताना सत्कारमूर्ती एम.जी. म्हात्रे सर यांनी रयत शिक्षण संस्थेविषयी व विद्यालयाविषयी कृतज्ञता व्यक्त केली आणि सर्वांच्या शुभेच्छांचा स्वीकार केला. शेवटी अध्यक्षीय भाषणात विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू यांनी देखील सेवापूर्तीच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे निवेदन एच एन पाटील आणि दर्शना माळी यांनी केले तर आभार श्रीमती सुतार डी.जे.यांनी मानले. यानंतर बी. एम.म्हात्रे मॅडम यांनी सर्व स्टाफला हळदी कुंकवाचे औक्षण करून सदिच्छा भेट दिली. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहकार्य केले.




## पनवेल महानगरपालिका आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्याकडून मनसेच्या पत्राची दखल मा.नितीन काळे यांच्याकडून आभार व्यक्त

**दै. युवक आधार प्रतिनिधी**
**राम ढाकणे**
**उरण रायगड.**

पनवेल महानगरपालिकेने खरेदी केलेले रुग्णवाहिका शववाहिनी खरेदी करून बरेच दिवस वासुदेव बळवंत फडके पनवेल नाट्यगृह या ठिकाणी एकत्रित धुळखात उभ्या केल्या होत्या, त्या खरेदी केलेल्या रुग्णवाहिका पनवेल महानगर परिसरातील कळंबोली, कामोठा, खारघर, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, पनवेल या ठिकाणी सर्वसामान्यच्या पैशातूनच खरेदी झालेली ही वाहने महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांना विनामूल्य मोफत सेवा साठी उपयोगी मिळाव्या याकरिता मनसेच्या वतीने माननीय नितीन काळे यांच्या मार्फत पत्र काही महिन्यापूर्वी देण्यात होतं,

त्या पत्राची दखल घेऊन पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त श्री. मंगेशजी चितळे यांनी या रुग्णवाहिका प्रत्येक शहरात वार्ड ऑफिसच्या शेजारी लोकसेवेसाठी खुल्या केल्या. मागील घेतलेल्या आंदोलनात सहभागी पनवेल महानगर सचिव नितीन काळे, प्रशांत कदम, पंढरी पवार, स्वप्निल घाडगे, शिवम पाटील, संजय कांजीलाल सर्व महाराष्ट्र सैनिक व पदाधिकारी यांनी घेतलेल्या मोहिमेला आज आनंदाचे महत्वपूर्ण यश आले. पनवेल कळंबोली मनसे परिवारातर्फे माननीय आयुक्त साहेबांचे आभार व्यक्त केले.




# रेती तस्करांपुढे महसूल यंत्रणा हतबल ! नदीपात्रातून अवैध उपसा जोरात

### रात्रीच्या अंधारात रेती तस्कर सक्रिय

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** सर्वांची नजर वर्धा नदी काठावर असून धर्मापूर,रोहीणी,हीरापुर या तिन घाटातून दररोज रात्री ते पहाटेपर्यंत अवैध रेती तस्करी ट्रॅक्टर द्वारे होत असून संबंधित अधिकारी बघायची भूमिका निभवतात.याला कारण म्हणजे आर्थिक देवाणघेवाण तर होत नाही ना असा प्रश्न जनता करीत आहेत.रेती तस्करी करण्यासाठी सर्व शासकीय नियम पायदळी तुडवत दररोज रात्र उपसा करीत आहेत. त्यामुळे महसूल यंत्रणा हतबल झाली आहे. शासनाचा करोडो रुपयांच्या महसूल बुडत असल्याचे जनतेत बोलले जात आहे.

**दररोज रात्रीपासून सकाळपर्यंत**

रेतीचा मोठ्या प्रमाणात उपसा होत आहे. धर्मापूर,रोहीणी,हीरापुर या तिन्ही घाटात वाहने उभे करून त्यात रेती भरून गुप्त मार्गान गावांमधून काढले जातात.त्यामुळे नागरिकांची झोपमोड होत असून रस्त्याची वाट लागली आहे.त्यामुळे रेती तस्करावर महसूल विभागाचे वतीने कार्यवाही का होत नाही असे गावकऱ्यांचे मत आहे. या अवैध रेती तस्करी व्यवसायात अडथळा ठरणाऱ्या महसूल विभाग संगणमत करून हा व्यवसाय मोठ्या जोमात सुरू आहे असे गावातील नागरिकांचे म्हणणे आहे.अवैधपणे होत असलेल्या या रेती तस्करांवर वरदहस्त कोणाचे असा प्रश्नही नागरिक करीत आहेत. एवढेच नाही तर एखाद्या वेळी रेती तस्करांचे ट्रॅक्टर मिळाले तरी कारवाई न करता स्वार्थापोटी सोडून देण्यात येते असे प्रकार नेहमी होत असल्याची जनतेमध्येध्ये चर्चा रंगत आहे. अवैध तस्करीवर संबंधित महसूल विभागाकडून कारवाई व्हावी व रेतीची चोरटी वाहतूक थांबवावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.





# विचुंबे ग्रामस्थांनी आमदार विक्रांत पाटील यांचे मन:पूर्वक आभार मानले

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

पनवेल आमदार विक्रांत पाटील यांनी शेतकऱ्यांचा विषय विधान भवनात नैना प्रभावित क्षेत्रातील बांधकामांमधील घरांचे बंद असलेले खरेदी विक्री रजिस्ट्रेशन सुरु करण्यासंदर्भात मार्ग निघावा यासाठी अ धिवेशन काळात एक तातडीची विशेष बैठक आयोजित करण्याची मागणी आ. विक्रांत पाटील यांनी केली होती, त्यानुसार राज्याचे महसूल मंत्री सन्मा चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात या संदर्भात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. गेले ९ महिन्यांपासून बंद असलेले खरेदी विक्री रेजिस्ट्रेशन हा शेतकरी व नागरिकांचा जिव्हाळ्याचा विषय असल्याने ते त्वरित सुरु करणे संदर्भात मागणी आमदार विक्रांत पाटील यांनी केली. या विषयात ठोस धोरण कसे तयार करता येईल या विषयी सकारात्मक चर्चा या बैठकीत झाली. नैना क्षेत्रातील बांधकामे संरक्षित करणे व ग्रामस्थांच्या नैना विषयी सर्व अडचणी दूर करण्याची मागणी आमदार विक्रांत पाटील यांनी सातत्याने केली असून या विषयात विशेष लक्षवेधी लावून शासनाचे लक्ष ही वेधून घेतले होते. त्यांच्या माध्यमातून या विषयाचा सतत पाठपुरावा सुरु असून या मागण्यांनुसार सिडको प्रशासनाने या विषयात सकारात्मकता दाखवली आहे, मग या विषयात खरेदी विक्री रेजिस्ट्रेशन सुरु करण्यासंदर्भात ही सिडको ने सकारात्मक भूमिका घ्यावी ही मागणीही आ. विक्रांत पाटील यांनी केली आहे. सदर विषयात तातडीने धोरण तयार करून नागरिकांना दिलासा द्यावा असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री सन्मा चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही सिडको व नोंदणी महानिरीक्षक यांना दिले.यावेळी नैना प्रकल्पग्रस्त अध्यक्ष वामन शेळके यांनी सांगितले नैना प्रकल्पग्रस्त असलेल्या शेतकऱ्यांचा पाठिंबा आमदार विक्रांत पाटील यांना असेल. एकंदरीत या विशेष बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याने या बरेच महिने रखडलेल्या नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या विषयात मार्ग निघण्याच्या अशा पल्लवीत झाल्या आहेत. या बैठकीला मा. कोकण म्हाडा सभापती श्री. बाळासाहेब पाटील, वासुदेव धर्मा भिंगारकर माजी सरपंच बळीराम दत्तात्रय पाटील माजी सरपंच वामन शेळके (अध्यक्ष) शेखर शेलके. सुभाष भोपी रिडघर माजी सरपंच प्रभाकर रघुनाथ भोईर सतीश राम म्हात्रे सदस्य समीर दूंद्रेकर सदस्य गणेश कडू.सुनील तुपे. सुरेश रामदास भोपी.गेनू चंद्रकांत भिंगारकर. नितीन विष्णू भोईर.संतोष राघो पाटील.विजय बाळाराम दूंद्रेकर.नरेश रमेश भिंगारकर.सुशील वासुदेव भिंगारकर. नितीन राम म्हात्रे.राहुल पांडुरंग भोईर.अक्षय जाधव.सागर येरुणकर.श्रीकांत पाटील. उमेश गणेश म्हात्रे.शुभम कदम.जगदीश काशिनाथ भिंगारकर.हरेश्वर काशिनाथ भिंगारकर. अभय बाळाराम गोंधळी. निकेश कांबळे.पवन सिंग. रोहन म्हात्रे.इत्यादी बहुसंख्येने उपस्थित होते





# तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे वतीने रमजान ईद निमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी** : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे प्राथमिक विद्यामंदिर, गो म वेदक विद्यामंदिर आणि कला- वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळाच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पहिली ते अकरावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना रमजान ईद निमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी, अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, वरचा मोहल्ला अध्यक्ष दिलावर खाचे, पट्टीवाला मोहल्ला अध्यक्ष मोहम्मद खान पठाण, प्राचार्य श्री दिलीप ढाकणे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री सचिन भाटे, शिक्षक प्रतिनिधी प्राध्यापक दयानेकर बी एन आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुस्लिम बंधू व भगिनींना गुलाब पुष्प देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे यांनी रमजान ईद का साजरा करण्याचे महत्व सांगून डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी असे आवाहन केले. या संस्थेत विविध धर्माचे विद्यार्थी शिक्षण घेत असून सर्वांना समान वागवले जात असल्याचे प्रतिपादन केले. शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे यांनी मुस्लिम धर्मातील विद्यार्थ्यांनी प्राध्यापक, वकील, डॉक्टर, इंजिनियर, पोलीस , सैनिक आदी क्षेत्रांत करिअर करून आपले आई बाबा, गाव व शाळेचे नाव रोशन करावे असे आवाहन केले व आपण सर्व एकच असून जात व धर्माच्या पलीकडे जाऊन एकमेकांना मदत व सहकार्य करूया असे प्रतिपादन केले. वरचा मोहल्ला अध्यक्ष दिलावर खाचे यांनी रमजान ईदच्या निमित्ताने या संस्थेत शैक्षणिक साहित्याचे वाटप हा स्तुत्य कार्यक्रम आयोजित केल्याने संस्थेचे पदाधिकारी व शिक्षकांना धन्यवाद दिले. संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी यांनी खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे या गीताचा संदर्भ देत रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. प्राचार्य श्री दिलीप ढाकणे यांनी प्रत्येकानी आपापला धर्म पाळावा, कोणीही इतर धर्माचा तिरस्कार करू नये, सर्व धर्माचा आदर करावा व घराचा उंब्रहाटा ओलांडल्यानंतर आपला धर्म बाजूला ठेवून मनुष्य हाच धर्म पाळावा असे सांगितले. अरीफा गोठेकर या विद्यार्थिनीने तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या संकुलात सर्वधर्म समभावाचे कार्यक्रम आयोजित केले जातात म्हणून आम्ही या महाविद्यालयात शिक्षण घेत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे निवेदन प्राध्यापक सर्जे व्ही बी यांनी केले. यावेळी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



## जाहीर प्रकटन

मी तस्लीम बानू मंन्सुरी, घर नंबर १०६, बिल्डिंग नंबर ४, वेलविशर टाऊन, खोपोली. माझ्या मालमत्ता खरेदी खत कराराच्या मूळ प्रत मधून एक पेपर हरवला आहे
करार दिनांक: २५/०२/२०२५
करार क्रमांक: १३५९
कराराचे स्वरुप / प्रकार: घरा चे खरेदी खत
हरवलेल्या कागदाचे विवरण : ( ४२/४४)
करारा करिता उपस्थिति असणाऱ्या दस्तावेज करून देणारे आणि घेणारे आणि साक्षीदार याची पावती.
जर कोणाला ही पावती भेटल्यास पुढील नंबर वर संपर्क करावा . +919712827856

## भारतीय प्राचीन हिंदू तर्कशुद्ध परंपरा आणि सात पिढ्यांचे गणित

**संपादनः आसाराम विरकर**

उपसंपादक दैनिक युवक आधार मराठवाडा आवृत्ती 50 50

भारतीय हिंदू संस्कृती ही केवळ धार्मिक परंपरांनी नाही तर वैज्ञानिक दृष्टिकोनातूनही विकसित झाली आहे. विवाहसंस्थेच्या नियमांपासून ते सामाजिक नातेसंबंधांपर्यंत प्रत्येक गोष्टीला वैज्ञानिक आधार आहे. सात पिढ्यांपर्यंत विवाह निषिद्ध का मानला जातो? सपिंड आणि सगोत्र संकल्पना का महत्त्वाच्या आहेत? यामागे खोल तर्कशुद्ध विचार आहे.

पिढ्या आणि आनुवंशिक गुणसूत्रांचे गणित मानवी शरीर आई-वडिलांकडून 50-50% गुणसूत्रे मिळवते. प्रत्येक पिढीत मूळ जोडप्याचे गुणसूत्र पुढच्या पिढ्यांमध्ये कमी प्रमाणात पोहोचते. या प्रक्रियेमुळे सात पिढ्यांनंतर रक्तसंबंध पूर्णतः विरळ होतो.

गुणसूत्रांची पिढ्यानुसार वाटणीः

पहिली पिढी – नवरा-बायको

दुसरी पिढी – त्यांची मुलं (सख्खी भावंडं) 50% गुणसूत्रे सामायिक

तिसरी पिढी – नातवंडे आजी-आजोबांकडून 25% गुणसूत्रे

चौथी पिढी – 12.5% गुणसूत्रे

पाचवी पिढी – 6.25% गुणसूत्रे

सहावी पिढी – 3.12% गुणसूत्रे

सातवी पिढी – 1.56% गुणसूत्रे

आठवी पिढी – < 1% गुणसूत्रे

सात पिढ्यांपर्यंत विवाह का निषिद्ध?

भारतीय हिंदू परंपरेनुसार, सात पिढ्यांपर्यंत रक्तसंबंध मानले जातात. एका वंशातील किंवा जवळच्या नात्यातील विवाहामुळे Genetic Disorders म्हणजेच आनुवंशिक आजार निर्माण होण्याचा धोका असतो. यामुळे पुढील पिढ्यांमध्ये जन्मजात अपंगत्व, मेंदूशी संबंधित आजार आणि प्रतिकारशक्तीतील त्रुटी येऊ शकतात. म्हणूनच, सपिंड विवाह (एकाच रक्तवंशातील विवाह) सात पिढ्यांपर्यंत निषिद्ध मानला जातो.

सपिंड आणि सगोत्र संकल्पना

सपिंड म्हणजे काय?

तीन पिढ्यांपर्यंत व्यक्ती सपिंड (एकाच रक्तवंशाचे) मानले जातात. म्हणजे आजोबा, वडील आणि मुलगा यांच्यात रक्तसंबंध जास्त निकटचा असतो.

चौथ्या ते सातव्या पिढीपर्यंत भाऊबंदकी मानली जाते, जरी रक्तसंबंध तुलनेने कमी असले तरी सामाजिक दृष्टिकोनातून ते नाते मानले जाते.

सगोत्र म्हणजे काय?

सात पिढ्यांनंतरही गोत्र बदलत नाही. त्यामुळे एका गोत्रातील विवाह आजही टाळले जातात.

यामागील तर्कशुद्ध कारण म्हणजे, जरी रक्तसंबंध संपला असला तरी वंशपरंपरेत विशिष्ट गुणसूत्रांचे अस्तित्व असते.

सात जन्म आणि विवाहसंस्था

भारतीय हिंदू विवाहसंस्था सात पिढ्यांपर्यंत रक्तसंबंध टिकवते आणि सात जन्मांची सोबत म्हणून मानली जाते. लग्नात घेतले जाणारे सात फेरे याच गोष्टीचे प्रतीक आहेत. सात पिढ्यांनंतर नाते समाप्त होते, पण गोत्र कायम राहतो, म्हणूनच सात जन्मांच्या सोबतीची संकल्पना रूढ झाली.

भारतीय परंपरेचे वैज्ञानिक महत्त्व

आपल्या पूर्वजांनी सामाजिक आरोग्य आणि संततीच्या सुरक्षिततेसाठी सात पिढ्यांचा नियम ठरवला. ही संकल्पना फक्त धार्मिक नव्हे, तर पूर्णपणे वैज्ञानिक आणि आनुवंशिक तत्त्वांवर आधारित आहे. आधुनिक विज्ञानही याच गोष्टीला मान्यता देते की, जवळच्या नात्यातील विवाहामुळे आनुवंशिक दोष उद्भवतात. म्हणूनच, हिंदू धर्माने हजारो वर्षांपूर्वीच या गोष्टीचा विचार करून विवाहसंस्था घडवली.

आपल्या पूर्वजांचे तर्कशुद्ध ज्ञान – आपला अभिमान

सात पिढ्यांच्या नात्याचा वैज्ञानिक विचार आणि हिंदू तत्त्वज्ञान यावर आधारलेली विवाहसंस्था आजही तितकीच प्रभावी आहे. आपल्या परंपरांचा अभिमान बाळगणे आणि त्यातील विज्ञान समजून घेणे ही काळाची गरज आहे. भारतीय प्राचीन हिंदू परंपरा केवळ श्रद्धेवर नव्हे, तर शुद्ध तर्कशुद्धतेवर आधारित आहे.

# अलिबागमध्ये रायगड जिल्हा शांतता कमिटीची बैठक

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

आगामी सण, उत्सव कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून सौहार्दपूर्ण वातावरणात साजरे करावेत असे महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी मागदर्शन करतांना सांगितले श्रीराम नवमी, हनुमान जयंती, महावीर जयंती, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आणि गुढी पाडवा व रमजान ईद हे सण, उत्सव कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून सौहार्दपूर्ण वातावरणात साजरे करण्यासाठी सर्वांनी जिल्हा प्रशासनासह पोलिस यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी केले. तसेच या कालावधीत जिल्हा पोलिसांची सोशल मीडियवर करडी नजर असून कुणीही सामाजिक एकता व सलोखा तसेच शांतता भंग करणारा मजकूर प्रसारीत करू नये, असे आवाहनही.महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी केले. रायगड जिल्हा प्रशासनाच्या मार्फत गुढीपाडवा, रमजान ईद, श्रीराम नवमी, हनुमान जयंती, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त नियोजन भवन सभागृहात शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मार्गदर्शन करताना. महिला व बालविकास मंत्री कु आदिती तटकरे बोलत होत्या. या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्यासह शांतता समिती सदस्य, सर्व उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी उपस्थित होते.आगामी सण व उत्सवाचा काळ लक्षात घेता जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावेत. सण-उत्सव साजरे करताना न्यायालयांच्या तसेच प्रशासनाच्या आदेशांचे पालन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे. उत्सवाला कोणतेही गालबोट लागणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. सण उत्सव आणि सलग आलेल्या सुट्ट्या पाहता पर्यटक मोठया प्रमाणावर येण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेता जिल्ह्यातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी बायपास मार्ग काढणे तसेच पर्यायी रस्ते कसे विकसीत करता येईल, याबाबत नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच या कालावधीत रुग्णवाहीका तैनात ठेवाव्यात. याबरोबरच फायर ब्रिगेडच्या गाड्या देखील सुसज्ज ठेवाव्या. अनेकदा मिरवणूक मार्गांवर अंधार असतो त्या ठिकाणी हॅलोजन ची व्यवस्था करावी. तसेच याकाळात वीज पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी असे निर्देश कु.आदिती तटकरे यांनी दिले.



सर्व सण उत्सव उत्साहात व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले. या काळात जिल्ह्यातील वाहतुकीचे नियोजन करण्यात येईल. तसेच ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो तेथे पुरेसे टँकर द्वारे पाणी पूरविण्यात येतील असेही सांगितले. तसचे सर्व सण, उत्सवाच्या काळात ड्रोन कॅमेऱ्याद्वारे विशेष पाहणी करण्यात येणार आहे.

**किशन जावळे**
**जिल्हाधिकारी रायगड**

रायगड जिल्ह्यात विविध सण आणि उत्सवांच्या निमित्ताने अनेक शोभायात्रा, मिरवणुका, रॅली आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. या कार्यक्रमांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुव्यवस्थेसाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या उपाय योजनाची माहिती दिली. या सर्व काळात पोलीस प्रशासन सज्ज आहे.

**सोमनाथ घार्गे**
**जिल्हा पोलीस अधिक्षक रायगड**

### सोशल मीडियावर करडी नजर

सण उत्सवा दरम्यान शांतता भंग करणारे तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारे अनुचित प्रकार होणार नाहीत. तसेच फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, ट्विटर व इतर सोशल मीडियावर तेढ निर्माण करणाऱ्या व खोट्या बातम्या प्रसारित करणारे व्हिडीओ किंवा पोस्ट प्रसारित करणाऱ्यांविरुध्द् रायगड जिल्हा पोलीस दलातील सायबर सेल मार्फत सोशल मीडियावर 24 तास विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. पोलिसांनी जिल्ह्यातील जातीय सलोखा कायम ठेवण्यासाठी सोशल मिडीयावरील घटनांचे विश्लेषण करण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. प्रक्षोभक पोस्ट करणाऱ्या व्यक्तीवर तात्काळ कारवाई करावी अशा सूचना कु.आदिती तटकरे यांनी यावेळी दिल्या. सर्वांनी सामाजिक शांतता ही नैतिक व सामूहिक जबाबदारी मानून कार्यक्रम करावेत. तसेच पोलीस प्रशासनाने देखील ज्या मिरवणूक व कार्यक्रम यांना ज्या नियमाच्या आधारे परवानगी दिली आहे त्याची एक प्रत कार्यक्रमासाठी निमंत्रित यांना द्यावी. या कार्यक्रमात शांतता भंग होणार याची दक्षता घ्यावी असे निर्देश मंत्री कु. आदिती तटकरे यांनी दिले.

## रेल्वे प्रशासनाने उगांव स्थानकावर पँसेंजरला थांब्याबाबत दोन महिन्यात सकारात्मक निर्णय घ्यावा

### शिवडीच्या सरपंच सांगळेंच्या याचिकेवर उच्च न्यायालयाचे रेल्वे प्रशासनास निर्देश

**दैनिक युवक आदर**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**उगांवः-** उगांव रेल्वे स्टेशनवर पँसेंजरला थांबा मिळत नसल्याने शिवडीच्या सरपंच संगिता सांगळे यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सुनवाणीदरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने रेल्वे प्रशासनास दोन महिन्यात सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहे.

कोविड कालावधीत लॉकडाऊनमुळे रेल्वेसेवा बंद झाली होती. लॉकडाऊननंतर रेल्वे सेवा पुर्ववत झाली. मात्र, उगांव रेल्वे स्टेशनवर थांबणारी इगतपुरी - भुसावळ, आणि भुसावळ - इगतपुरी या पँसेंजरला उगांव रेल्वे स्टेशनला थांबा दिला गेला नाही. त्यामुळे रेल्वे स्टेशन परिसरातील शिवडी, उगांव, खेडे, वनसगांव, सोनेवाडी, थेटाळे आदी भागातील नागरिक, विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक यांना नाशिक, भुसावळ, मुंबई, नागपुर अशा शहरात जाणे - येणेसाठी रेल्वे सुविधेअभावी गैरसोय निर्माण झाली होती. उगाव रेल्वे स्थानकावर स्टेशन मास्तर व इतर कर्मचारी नियुक्त असूनही रेल्वे थांबत नसल्याने ग्रामस्थांची परवड होत होती. स्थानिक नागरिक व ग्रामपंचायत प्रशासनाने रेल्वे प्रशानास तसेच लोकप्रतिनिधी यांना वारंवार निवेदने देऊनही उपयोग झाला नाही. त्यामुळे शिवडीच्या सरपंच संगिता सांगळे यांनी उच्च न्यायालयात धाव घेत अड.नारायण रोकडे, अड.अभंग सुर्यवंशी, अड.सिध्दार्थ घोडके यांचेमार्फत याचिका दाखल केली. याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान मध्य रेल्वेच्या भुसावळ मंडळाकडुन रेल्वे बोर्डास त्याबाबत प्रस्ताव प्राप्त आहे असे स्पष्ट करण्यात आले. त्यावर उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती रविंद्र घुगे व न्यायमुर्ती अश्विन भोभे यांनी रेल्वे प्रशासनाने दोन महिन्यात उगांव रेल्वे स्थानकावर पँसेंजरला थांबा देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहे.



उगांव रेल्वे स्थानकावर पँसेंजर अथवा कोणत्याही प्रवासी गाडीस थांबा देण्याची मागणी सतत निवेदनाद्वारे करुनही दखल घेतली गेली नाही. मात्र, न्यायदेवतेने सामान्य नागरिक, नोकरदार, व्यवसायिक, विद्यार्थी यांच्या मागणीबाबत योग्य निर्देश दिले आहेत.

**- भगिरथ शिंदे**
**माजी सरपंच, शिवडी**

## जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर अशोक थोरात यांचे निलंबन रद्द करा, पाटोदा येथे पत्रकार संघाची मागणी.

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** बीडचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्या वर झालेली निलंबनाची कारवाई ही राजकीय द्वेष व आकसापोटी झालेली असून डॉ.थोरात यांच्या सारखा कर्तव्यदक्ष व सर्वसामान्य गोरगरीब रुग्णांसाठी कायम सहकार्य करणारा शल्यचकित्सक बीड साठी नसणे ही बाब गोरगरीब रुग्णांचा आधार हिरावणारी आहे. त्या मुळे डॉ.अशोक थोरात यांचे निलंबन तातडीने रद्द करून त्यांना पुन्हा सेवेत घ्यावे अशी मागणी पाटोदा येथे पाटोदा तालुका पत्रकार संघ व बीड जिल्हा पत्रकार संघ पाटोदा शाखेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या संदर्भात तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांचे मंगळवार दिनांक २५ मार्च रोजी विधीमंडळात एका आमदार महोदयांनी राजकीय व इतर द्वेषातुन उपस्थित केलेल्या लक्ष वेधीतुन डॉ.थोरात यांच्या वर बिनबुडाचे आरोप केले व त्या नंतर संबंधित आरोग्यमंत्र्यांनी देखील या संदर्भात इतर लोकप्रतिनिधीचे मत जाणुन न घेता व बीड जिल्ह्यातील एकंदर परिस्थितीचा विचार न करता हा तुघलकी निर्णय जाहिर करण्यात आला, वास्तविक पाहता डॉ.अशोक थोरात हे शल्यचिकित्सक म्हणुन अत्यंत उत्कष्ट पध्दतीने कार्यरत होते. सर्वज्ञम्ज्ञन्य गोरगरीब रुग्णासाठी संपुर्ण जिल्ह्यातील शासकिय रुग्णालयामध्ये व विशेषतः बीड येथील मुख्य शासकिय रुग्णालयात दर्जेदार उपचार मिळावेत या साठी ते सातत्याने प्रयत्नशिल असतात. सर्वसामान्य रुग्णाच्या अडीअडचणीत पाठीशी उभा राहणारा व थेट संपर्क ठेवणारे डॉ.थोरात हे एकमेव अधिकारी असुन त्यांच्या वरील निरर्थक आरोपांमुळे केलेली कारवाई तातडीने रद्द करून त्यांच्या वरील निलंबनाची कारवाई रद्द करावी अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रसंगी पाटोदा तालुका पत्रकार संघाचे संस्थापक/अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे बीड जिल्हा पत्रकार संघाचे पाटोदा तालुकाध्यक्ष अँड.महेश बेदरे, पत्रकार पोपट कोल्हे, पत्रकार अमीर शेख(सचिव), सुधीर एकबोटे(शहराध्यक्ष), पत्रकार रियाज सय्यद(तालुका उपाध्यक्ष), विजय जाधव, शेख महेशर(संघटक), राहुल सोनवणे(सहसचिव), पत्रकार सचिन गायकवाड, छायाचित्रकार सखाराम भोसले यांच्या सह इतर पत्रकारांची उपस्थिती होती .



# पनवेल येथील आरझेडपी प्राथमिक शाळेचे आधुनिकीकरण

## एनोबल सोशल इनोव्हेशन्सचे सहकार्य

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
**नवी मुंबई, 28 मार्च 2025:**

शाळेत शिकणाऱ्या मुलांना चांगले आणि स्वच्छ अभ्यासाचे वातावरण निर्माण व्हावे तसेच विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि शाश्वत शिक्षण वातावरण प्रदान करून त्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे या उद्देशाने रायगडमधील पनवेल येथील आरझेडपी प्राथमिक शाळेचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. आयजी पेट्रोकेमिकल्स लिमिटेडने एनोबल सोशल इनोव्हेशन्सच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत शाळेच्या नूतनीकरणात स्वच्छता आणि सुरक्षित पिण्याचे पाण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले. शाळेतील स्वच्छता सुविधा पूर्णपणे दुरुस्त करण्यात आल्या. प्रत्येक मजल्यावरील मुलांसाठी आणि मुलींसाठी स्वच्छतागृहांचे नूतनीकरण करण्यात आले. येथे शिकणाऱ्या मुलांना स्वच्छ शौचालये उपलब्ध करून देण्यासाठी नवीन प्लंबिंग, नवीन टाइल्स, सुरक्षित दरवाजे, एक्झॉस्ट फॅन आणि पाण्याच्या टाक्या बसवण्यात आल्या. याव्यतिरिक्त, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुधारण्यासाठी आणि सुरक्षित करण्यासाठी एक नवीन पाण्याची टाकी बांधण्यात आली. विद्यार्थ्यांना दिवसभर स्वच्छ आणि निरोगी पाणी मिळावे यासाठी प्युरिफायर, अपग्रेडेड प्लंबिंग आणि नवीन टाइल्स बसवण्यात आल्या.

स्वच्छतेची खात्री करण्याव्यतिरिक्त, शाळेच्या प्रत्येक पैलूचे अपग्रेडेशन करण्यात आले. नवीन रंगरंगोटी, संरचनात्मक दुरुस्ती, सुधारित प्रकाशयोजना आणि सुधारित सुरक्षा उपायांमुळे शाळेत सुरक्षित आणि अधिक आरामदायी शिक्षण वातावरण सुनिश्चित झाले. याशिवाय, शाळेतील 11 वर्गखोल्या, संगणक प्रयोगशाळा, कार्यालय आणि कॉरिडॉरची पुनर्बांधणी प्लास्टरचे काम, भेगा दुरुस्त करून आणि रंगकाम करून करण्यात आली. खिडक्यांना सुरक्षित ग्रिल आणि जाळी बसवण्यात आली होती आणि मुख्य गेट मजबूत करण्यासाठी त्याची दुरुस्तीही करण्यात आली होती. वेंटिलेशन आणि दृश्यमानता वाढवण्यासाठी वर्गांमध्ये नवीन पंखे, दिवे आणि स्विच बोर्ड बसवून इलेक्ट्रिकल पायाभूत सुविधा मजबूत करण्यात आल्या. शाळेत डिजिटल शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाशी जोडता यावे यासाठी संगणक प्रयोगशाळा पुनर्संचयित करण्यात आली. या प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते, ज्यात आ य जी पी ए ल चे का य र्का री संचालक श्री सागर जाधव,. डॉ. व्ही. पी. राजकुमार सीएचआरओ आणि प्रमुख-सीएसआर, आयजीपीएल, बलराम पाटील, माजी एमएलसी, कोकण शिक्षक मतदार संघटना, शेतकरी आणि कामगार पक्ष, वसंत पाटील, सामाजिक कार्यकर्ते, सीताराम मोहिते, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पनवेल, निंबाजी गीते, केंद्रप्रमुख, नावडे केंद्र , समीर पळसुले, मुख्य लोक अधिकारी (रणनीती), एनोबल, आणि राहुल जयस्वाल, एनोबलचे प्रकल्प व्यवस्थापक हे प्रमुख होते.



## एसटी बसची कारला भीषण धडक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: अहमदनगरहून दादरला जाणाऱ्या एसटीवरील चालकाचे नियंत्रण सुटून बसने कारला धडक दिल्याची घटना पनवेल-सायन महामार्गावर खारघर-कोपरा पूल येथे गुरुवारी दुपारी घडली.

एसटी बस क्रमांक एम एच 13 सीयू 6863 भरधाव वेगाने जात असताना महामार्गावरील डाव्या बाजूला चालत असलेल्या कारला मागून धडक दिल्याने कार जागेवर गोल फिरली. आणि रस्त्याच्या उजवीकडील डिव्हायडरला धडकली. या धडकेत कारचे मोठे नुकसान झाले असून डिव्हायडर वरील सिमेंट ब्लॉकचे तुकडे झाले आहेत. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून कारचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात कार मध्ये ५ प्रवासी होते. कार क्रमांक एम एच 09 एफयु 2030 मुंबईच्या दिशेने जात असताना खारघर कोपरा पूल येथे हा अपघात झाला. अपघातामुळे महामार्गावर 2-3 किलोमीटर पर्यंत वाहतूक कोंडी झाली होती. अपघाताची माहिती खारघर वाहतूक पोलिसांना कळताच घटनास्थळी दाखल होऊन पोलिस अमलदार किरण कदम व सुहास गुरव यांनी तात्काळ अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करून रस्त्यावरील सांडलेल्या गाडीतील ऑइलवर माती टाकून वाहतूक सुरळीत केली. याबद्दल तेथील जमावाने पोलिसांचे कौतुक केले.

# जिहाद म्हणजे वाईट प्रवृत्तीशी लढा

पवित्र रमजान महिना उद्या पूर्णत्वास जात आहे. गेले महिनाभर रोजे धरून आपल्या स्वतःवर नियंत्रण मिळवत आपल्या इच्छा-आकांक्षा यांना नियंत्रित करून अल्लाहची मर्जी संपादन करण्यासाठी संयम आणि धिरोदात्तपणा वाढीस लावण्यासाठी या महिन्याचे पालन आपण केलेले आहे.एक महिनाभर केलेली उपासना पुढील वर्षभर नव्हे तर आयुष्यभर आपल्यामध्ये कायम राहण्यासाठी हे संस्कार निश्चितपणे उपयोगी पडणार आहेत. आपल्यातील चुकीच्या सवयी,विचारसरणी भावना,कायमस्वरूपी नष्ट करून सदाचारी जीवनासाठी आवश्यक असलेल्या प्रेरणा या माध्यमातून निर्माण करण्याचे कार्य रमजान महिन्यामध्ये झाले आहे. ते टिकविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.मनाची एकाग्रता, विचारांची परिपक्वता आणि ध्येयाप्रति असलेली निष्ठा या गोष्टींमुळे आपल्यामध्ये चांगल्या सवयी निश्चितपणे वाढीस लागतील अशी आशा आहे. इस्लामी संस्कृतीत वापरला जाणारा एक प्रमुख शब्द म्हणजे जिहाद. जिहाद शब्दाबद्दल व त्याच्या एकूणच कार्याबद्दल खूप गैरसमज आहेत. जिहादचा अर्थ आहे संघर्ष.प्रत्येक चुकीच्या गोष्टीच्या विरोधात केलेला संघर्ष म्हणजे जिहाद.तो अनेक प्रकारचा असू शकतो. शत्रूविरुद्ध दिलेला लढा म्हणजे जिहाद असा प्रामुख्याने समज आहे आणि तो काही अंशी योग्य देखील आहे. माणसाच्या जीवनामध्ये ज्या वाईट प्रवृत्तींनी शिरकाण केले आहे, त्याविरुद्ध केलेला उठाव म्हणजे देखील जिहाद होय. अन्याय,अत्याचार, जुलूम या गोष्टीविरुद्ध आवाज उठवून संघर्ष करणे म्हणजे जिहाद करणे होय.ज्यावेळी टोकाचा विरोध होतो आणि विनाकारण एखादी गोष्ट लादली जाते त्यावेळी जो संघर्ष करावा लागतो तोच जिहाद. आज तलवारी घेऊन लढाया होत नसल्या तरी इतर मार्गांनी एकमेकांच्या विरोधात कट-कारस्थाने करण्याची कामं सुरु आहेत. जागतिक




पातळीवर अमेरिका, रशिया यासारख्या बलाढ्य शक्ती इतर देशांना वेठीस धरून आपली दादागिरी करीत आहे.अशावेळी तुर्की सारखं छोटे राष्ट्र त्यांना निकराने लढा देत आहे. तुर्कीचा हा संघर्ष म्हणजेच जिहाद होय. इसराइल आणि पॅलेस्टाईन यांच्यातील संघर्ष म्हणजे जिहाद आहे. कोणावरही अन्याय किंवा अत्याचार किंवा जुलूम करू नका ही इस्लामची शिकवण आहे.पण जर कोणी मुद्दामहून या गोष्टी करीत असेल आणि समजावून ही थांबत नसेल तर त्याविरुद्ध उभारलेला लढा हा जिहाद म्हणून संबोधला जातो.आपल्या समाजात अनेक चुकीच्या गोष्टी सुरू आहेत.भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. कायद्याचा चुकीचा अर्थ लावून दुरुपयोग होत असताना यंत्रणा मात्र फक्त पहात आहे. सर्वसामान्य लोक न्यायासाठी अधीर झालेले आहेत.या सर्व घटकांना आधार देण्यासाठी जो लढा उभारला जातो तो जिहाद म्हणून संबोधला जातो.आज सामान्य माणूस खूप भरडला जात आहे.त्याला आधार देण्यासाठी कोणीतरी पुढे येण्याची आवश्यकता आहे. महागाईचा आगडोंब उसळला आहे. धार्मिक आणि जातीय संघर्ष निर्माण करून कोणी तरी आपले मनसुबे फत्ते करू पाहत आहे.जे जे चांगले आहे ते स्वीकारून चुकीच्या पद्धती विरुद्ध एकत्र येऊन संघर्ष केला पाहिजे याला सामाजिक जिहाद म्हणता येईल. लव जिहाद हा प्रकार इस्लाममध्ये कुठे ही अस्तित्वात नाही.तो एका विशिष्ट विचार शैलीच्या यंत्रणेने निर्माण केलेला शब्द आहे. प्रत्येक समाजाने आपल्या तरुण मुलामुलींवर बारीक लक्ष ठेवून त्यांच्या एकूण वर्तणुकीचे निरीक्षण करून योग्य उपाययोजना केली तर लव जिहाद हा शब्द हद्दपार होईल.प्रेमाच्या नावाखाली होणारा हा प्रकार कोणत्याही समाजाच्या कुटूंबाची सामाजिक मानहानी करणारा असतो.यामध्ये वेगळ्या आकर्षणापोटी जर कोणी प्रवाहित होत असेल तर त्याला रोखण्याची जबाबदारी ही समाजातील सर्व घटकांची आहे. (क्रमशः)

**सलीमखान पठाण**

**9226408082.**

## लासलगाव शांतता समितीची बैठक संपन्न : रामनवमी व ईद-ए-मिलाद डीजे मुक्त पारंपारिक पद्धतीने साजरी करण्याचा संकल्प

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**लासलगाव :** सध्या विविध ठिकाणी घडणाऱ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर लासलगाव पोलीस स्टेशन येथे शांतता समितीची बैठक पार पडली. या बैठकीला मुंबई बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर, बीजेपी चे नेते राजेंद्र चाफेकर, माजी पंचायत समिती सदस्य शिवा पाटील सुरासे, बीजेपी युवा नेते रवींद्र होळकर, बीजेपी महिला आघाडी सुवर्णा जगताप, सरपंच योगिता पाटील, उपसरपंच रामनाथ शेजवळ,माजी सरपंच अफजल शेख, तन्वीर शेख, लासलगाव शहर विकास समितीचे राजाभाऊ कराड, संदीप उगले,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे,पोलीस उप निरीक्षक, भास्कर शिंदे, पीएसआय सुपनर , तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, मुस्लिम समाजातील नागरिक, उत्सव समितीचे पदाधिकारी, पोलीस कर्मचारी व पत्रकार उपस्थित होते. बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमजान ईद आणि रामनवमी या महत्त्वाच्या सणांच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था राखण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. पोलीस उप निरीक्षक भास्कर शिंदे यांनी गावात शांतता टिकवण्यासाठी पोलिसांची भूमिका स्पष्ट केली व नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. सध्या सोशल मीडिया समाजात वाद आणि गैरसमज निर्माण करण्याचे प्रमुख साधन ठरत आहे. विशेषतः १५ ते २५ वयोगटातील युवक सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकत असल्याने वाद उद्‌भवतात. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारची माहिती पोलिसांपर्यंत तत्काळ पोहोचवावी, तसेच मी कोणत्या जाती धर्माचा याचा विचार न करता मी लासलगावकर असून गावात शांतता राखण्याची जबाबदारी माझी असल्याचा संकल्प तरुणांनी करण्याचे आवाहन पोलीस डॉ. निलेश पालवे यांनी केले. शांतता राखण्याची जबाबदारी पोलिसांबरोबर समाजातील प्रतिष्ठित आणि जबाबदार व्यक्तींनीही स्वीकारली पाहिजे. समाजात कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी शांतता समिती सदस्यांनी सतर्क राहावे, असे मार्केट कमिटीचे संचालक जयदत्त होळकर यांनी सांगितले. तसेच, समाजात अज्ञानता दूर करण्यावर भर दिला पाहिजे आणि महापुरुषांच्या स्मारकांचा सन्मान योग्य प्रकारे व्हायला हवा, असेही त्यांनी स्पष्ट केले. बीजेपी महिला आघाडीच्या सुवर्णा जगताप यांनी गावात आजपर्यंत कुठलाही अनुचित प्रकार घडलेला नाही आणि यापुढेही घडणार नाही, अशी ग्वाही दिली. पोलिसांकडून प्रत्येक सणाला बंदोबस्त ठेवण्याची तयारी असल्याचे सांगण्यात आले. गावकऱ्यांनी शांतता समितीच्या या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, रामनवमी उत्सवा निमित्ताने काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेमध्ये डीजे न वाजवता, 200 टाळकरी व भजनी मंडळी राम नामाचे अभंग गात व पारंपारिक पद्धतीने शोभायात्रा काढणार असल्याचे लासलगाव शहर विकास समितीचे राजाभाऊ कराड यांनी सांगितले त्याचबरोबर मुस्लिम समाजाची ईद-ए-मिलाची शोभायात्रा बिना डीजे निघणार असल्याची माहिती मुस्लिम समाजाचे युवा नेते तन्वीर शेख यांनी सांगितले सण-उत्सव हे सामाजिक सलोख्यात पार पडावेत यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन सर्वसामाजिक घटकांनी बैठकीच्या शेवटी सर्वांनी एकजुटीने शांतता व सुव्यवस्था राखण्याचा संकल्प केला



# श्री छत्रपती हायस्कूल सणसरच्या विज्ञान प्रयोगशाळेचे उदघाटन संप्पन

दैनिक युवक आधार
सणसरः- विकास क्षत्रिय

श्री.छत्रपती हायस्कूल सणसर या विद्यालयाला चार लाख रुपये किमतीची "स्टेम लर्निंग लॅब" मिळाली.शुक्रवार दिनांक 28/ 3/2025 या दिवशी या लॅबचे उदघाटन श्री.छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.प्रशांत दादा काटे, व्हाईस चेअरमन श्री.अमोल बापू पाटील,संचालक श्री.रणजीत भैया निंबाळकर आणि निर्माण बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक श्री.संतोष जाधव साहेब व चाइल्ड राईट अँड यु (क्राय)च्या प्रोग्रॅम मॅनेजर शिल्पा देहड यांच्या शुभहस्ते झाले.त्यावेळी सणसर गावचे सरपंच श्री. यशवंत भाऊ नरुटे पाटील, सणसर गावचे माजी सरपंच श्री. पार्थ बाबा निंबाळकर,सणसरचे ग्राम विकास अधिकारी श्री.सचिन पवार साहेब,श्री.




छत्रपती हायस्कूल सोनगाव चे मुख्याध्यापक श्री.गायकवाड सर,श्री. छत्रपती मुलींचे हायस्कूल भवानीनगरचे मुख्याध्यापक श्री. गिरीगोसावी सर,निर्माण बहुउद्देशीय संस्थेचे जिल्हा समन्वयक श्री.रवी पवार सर, निर्माण बहुउद्देशीय संस्थाचा स्टाफ श्री.संकेश तोरणे सर , श्री.अतुल ढोणे सर,श्री. किरण यादव सर,दिपाली कांबळे मॅडम,सारिका धोत्रे मॅडम,योगिता धोत्रे मॅडम, मोनिका माने मॅडम हे मान्यवर उपस्थित होते.सर्व मान्यवरांनी लॅबचे निरीक्षण केले त्यावेळी विद्यालयाचे विज्ञान विषय प्रमुख श्री भोसले डी आर सर,कु.काळे मॅडम,कु. निंबाळकर टी आर मॅडम, सौ माने मॅडम,कु.राजपुरे मॅडम यांनी मान्यवरांना विविध प्रोजेक्टची कृतीद्वारे अतिशय सूक्ष्म अशी माहिती दिली. त्यानंतर मान्यवरांपैकी विद्यार्थ्यांना निर्माण बहुउद्देशीय संस्थे विषयी माहिती संस्थेचे संस्थापक श्री. संतोष जाधव साहेब यांनी दिली तसेच चाईल्ड राईट अँड यु( क्राय )च्या प्रोग्राम मॅनेजर शिल्पा देहड मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर श्री.छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन श्री.अमोल बापू पाटील यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या लॅब मध्ये इयत्ता पाचवी ते दहावीचे एकूण 106 प्रोजेक्ट उपलब्ध आहेत.या लॅब मध्ये विद्यार्थ्यांना वैज्ञानिक, तांत्रिक, अभियांत्रिकी आणि गणित या विषयाचे सखोल ज्ञान घेता येणार आहे.स्टेम लर्निंग लॅब उदघाटन समारंभ यशस्वी करण्याकरिता विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सर्जे एस.डी.सर यांचे मार्गदर्शनाखाली विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू आणि भगिनी त्यामध्ये श्री चव्हाण यु बी,सर,श्री संभाजी भोईटे सर,श्री भोसले डी आर सर,श्री वाघमोडे जी. डी. सर,श्री भोसले एस.पी. सर, श्री. सोनवणे पी. डी.सर,श्री यादव सर,श्री घाडगे पी. एच. सर,श्री. आकाश चव्हाण सर,श्री.राहुल कुंभार सर,कु. काळे मॅडम,सौ.माने मॅडम, कु.राजपुरे मॅडम,कु. निंबाळकर टी.आर. मॅडम,कु.ताकवले मॅडम,कु. घाडगे मॅडम,पवार मॅडम, त्याचप्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी श्री.जगदाळे सर, श्री.यशवंत चव्हाण,श्री. शामराव गायकवाड,श्रीमती. कांचनताई काटकर श्री. विकास भाऊ फुले यांनी मोलाचा वाटा उचलला. विशेषतःविद्यालयाचे कलाशिक्षक श्री घाडगे पी. एस. सर यांनी सुंदर अशी रांगोळी काढून लेझीमच्या पथकाच्या माध्यमातून उपस्थित पाहुण्यांचे जंगी स्वागत केले.अतिशय आनंदी आणि उत्साही वातावरणामध्ये स्टेम लर्निंगलॅब चा उदघाटन समारंभ कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे आभार विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. संभाजी भोईटे सर यांनी मानले.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री.सोनवणे पी.डी.सर यांनी केले.

## नागरिकांनी जिवंत सातबारा मोहिमेचा लाभ घ्यावा :- तहसिलदार विशाल नाईकवाडे

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे

**विंचूर** :- राज्य शासनाच्या वतीने १०० दिवसांचा कृती आराखडा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महसूल विभागाची जिवंत सातबारा मोहीम सुरु आहे. या योजनेत मयत खातेदारांची नावे कमी होऊन वारसांची नावे लागणार आहेत. त्यामुळे या योजनेचा लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे. सातबाऱ्यावर असलेल्या मयताच्या नावांमुळे अनेकांना खरेदी – विक्री व्यवहार, कर्ज प्रकरण यासह अनेक प्रकरणात अडचणींना तोंड द्यावे लागत आहेत. सातबाऱ्यावरील ही अडचण दूर करण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभाग १०० दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत १ एप्रिलपासून राज्यात 'जिवंत सातबारा मोहीम जाहीर केली आहे. जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये १ मार्चपासून सुरू असलेली जिवंत सातबारा मोहीम आता राज्यभर राबविली जाणार आहे. जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. मयत खातेदारांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांमध्ये वारसांची नोंद अभिलेखामध्ये नसल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. या दृष्टिकोनातून संपूर्ण राज्यात जिवंत सातबारा मोहीम राबविण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आला आहे. दि.१ ते ५ एप्रिल दरम्यान ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) त्यांच्या सजाअंतर्गत येणाऱ्या गावामध्ये चावडी वाचन करून न्यायप्रविष्ट प्रकरणे सोडून गावनिहाय मयत खातेदारांची यादी तयार करणार आहेत. दि.६ ते २० एप्रिल दरम्यान वारसासंबंधी आवश्यक कागदपत्रे (मृत्यूदाखला, वारसाबाबत सत्य प्रतिज्ञालेख/स्वयं घोषणापत्र, पोलिस पाटील/सरपंच ग्रामसेवक यांचा दाखला, सर्व वारसांचे नावे, वय, पत्ते व दूरध्वनी क्रमांक/ भ्रमणध्वनी क्रमांक, रहिवासबाबतचा पुरावा ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडे सादर केला जाणार आहे. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी स्थानिक चौकशी करुन मंडळ अधिकाऱ्यांमार्फत वारस ठराव ई फेरफार प्रणालीमध्ये मंजूर करणार आहेत. दि. २१ एप्रिल ते १० मे दरम्यान ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी ई फेरफार प्रणालीमध्ये वारस फेरफार तयार करणार आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून मंडळ अधिकारी वारस फेरफारवर निर्णय घेऊन त्यानुसार सातबारा दुरुस्त करणार आहेत. या योजनेची तहसीलदारांपासून विभागीय आयुक्तांपर्यंत जबाबदारी राहणार असून त्या तालुक्याचे संबंधित तहसीलदारांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी आपल्या अधिनस्त कार्यक्षेत्रात कालबद्ध कार्यक्रम मुदतीत पूर्ण करण्याची कार्यवाही करणार आहेत. जिल्हाधिकारी हे नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. तालुक्यांचा वेळोवेळी आढावा घेऊन मोहीम राबविण्यामध्ये काही अडचणी येत असल्यास त्यांचे निराकरण करणार आहेत. विभागीय आयुक्त विभागीय संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. साप्ताहिक अहवाल प्रत्येक सोमवारी ई–मेलवर सादर करणार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या जिवंत सातबारा या मोहिमेमध्ये मयत शेतकरी खातेदार यांच्या वारसांनी आवश्यक कागदपत्रे जसे की अर्ज, जबाब, स्थानिक चौकशी, मृत्यू दाखला, प्रतिज्ञापत्र, पोलीस पाटील, सरपंच किंवा ग्रामसेवक यांचा दाखला, सर्व वारसांची नावे, वय, पत्ते, रहिवास बाबत पुरावा घेऊन संबंधित ग्राम महसूल अधिकारी कार्यालय यांच्याकडे संपर्क करून आपली वारस नोंद करून घ्यावी.

**मा.विशाल नाईकवाडे**
**तहसिलदार, निफाड**

## प्रवीण महाजन याने अपंगावर मात करत बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक पटकावला

दैनिक युवक आधार
रणजीत सिंह ठाकुर

अपंगत्वावर मात करत प्रविण महाजन यांचा बॉडीबिल्डींग स्पर्धेत भारतातून दुसरा क्रमांक हजारोंसाठी ठरले प्रेरणास्त्रोत : दक्षता फिटनेस क्लबच्या वतीने गौरव वाशिम : अपंगत्व ही मर्यादा नाही, तर ती संधी असल्याचे सिद्ध करत वाशिम शहरातील प्रवीण मुकेशकुमार महाजन यांनी बॉडी–बिल्डिंग क्षेत्रात मोठे यश मिळवले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुराळा येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले महाजन सर यांनी शिर्डी येथे झालेल्या इंडियन बॉडी–बिल्डिंग अ‍ॅण्ड फिटनेस फेडरेशनच्या राष्ट्रीय बॉडीबिल्डींग स्पर्धेत संपुर्ण भारतातून द्वितीय क्रमांक पटकावून रौप्य पदक मिळवले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल दक्षता फिटनेस क्लबच्या वतीने गुरुवार, २७ मार्च त्यांचा सत्कार करण्यात आला. ही प्रतिष्ठित स्पर्धा २५ मार्च रोजी शिर्डी येथे पार पडली. यंदा या स्पर्धेचे ६२ वे वर्ष होते. पोलिओमुळे ४७ टक्के अपंगत्व असूनही ४३ वर्षांच्या वयातही जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर बॉडी–बिल्डिंगचा छंद जोपासत महाजन यांनी हे यश मिळवले आहे. कठीण परिस्थितीवर मात करत प्रवीण महाजन यांनी मिळवलेले यश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या प्रवासात आंतरराष्ट्रीय खेळाडू व वाशिम पोलीस प्रदीप पाटील यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. त्यांच्या संघर्षमय प्रवासाने नवोदित खेळाडूंना नवी ऊर्जा दिली असून, अपंगत्वावर मात करून स्वप्नं साकारली जाऊ शकतात, हे त्यांनी सिद्ध केले आहे.




## जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा धोडप (बु) येथील पाच विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड

दैनिक युवक आधार
रिसोड वार्ताहर
रणजीत सिंह ठाकुर

जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, धोडप (बु) येथील पाच विद्यार्थ्यांनी जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत यश संपादन करून विद्यालयाचे आणि गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर हा मोठा टप्पा पार केला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत आर्यन विजय पद्मने आयुष समाधान बोडखे ,शुभम गोपाल बदामे वेदांत संतोष बिलारी पार्थ श्रीकांत पोपळघट शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचा प्रयत्न या विद्यार्थ्यांच्या यशामागे शाळेचे शिक्षक श्री. विजय आंभोरे सर , राहुल साखरकर आणि संपूर्ण शिक्षकवृंदांचे कठोर परिश्रम आणि उत्कृष्ट मार्गदर्शन आहे. या विद्यार्थ्यांना शाळेने सुरुवातीपासूनच गुणवत्ता वाढवण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले. सतत सराव परीक्षा, प्रशासकीय नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर दिलेले लक्ष यामुळे हे यश शक्य झाले. विद्यार्थ्यांना लाभलेले पालकांचे आणि समाजाचे सहकार्य या यशामध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन,पालकांचे सहकार्य तसेच समाजातील विविध स्तरांमधून मिळालेला पाठिंबा यांचा मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर हा यशस्वी प्रवास पूर्ण केला. गावाचा अभिमान आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा! या यशस्वी विद्यार्थ्यांनी संपूर्ण शाळेचा आणि गावाचा गौरव वाढवला आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी संपूर्ण गावाने शुभेच्छा दिल्या आहेत. "हे विद्यार्थी भविष्यातही उज्ज्वल यश संपादन करून देशाच्या प्रगतीमध्ये मोलाचा वाटा उचलतील," अशा शुभेच्छा शाळेच्या शिक्षकवृंद आणि गावकऱ्यांनी दिल्या. पाचही विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी मनःपूर्वक शुभेच्छा आणि उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक अभिनंदन!



## केंद्रीय जीएसटी कार्यालये २९-३१ मार्च रोजी सुरू राहणार

**नवी दिल्ली** : केंद्रीय सीजीएसटी (सीजीएसटी) क्षेत्रीय कार्यालये २९-३१ मार्च रोजी सुरू राहतील, असे केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने शुक्रवारी सांगितले. सीबीआयसी निर्देश आयकर विभाग कार्यालयांबाबत केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या (सीबीडीटी) निर्देशांनंतर काही दिवसांनी प्रलंबित विभागीय काम पूर्ण करणे सुलभ करण्यासाठी आला आहे.

## तिसऱ्या तिमाहीत चालू खात्यातील तूट ११.५ अब्ज डॉलरपर्यंत वाढली

**मुंबई** : भारताची चालू खात्यातील तूट (सीएडी) डिसेंबर तिमाहीत ११.५ अब्ज अमेरिकन डॉलर किंवा जीडीपीच्या १.१ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. मागील वर्षी वरील महिन्यात हा आकडा १०.४ अब्ज डॉलर (जीडीपीच्या १.१ टक्के) पर्यंत वाढली आहे. व्यापार तूट वाढल्याचा हा परिणाम आहे, असे शुक्रवारी जाहीर झालेल्या

**आरबीआयची माहिती**

आरबीआयच्या आकडेवारीनुसार दिसून येते. तथापि, २०२४-२५ च्या डिसेंबर तिमाहीतील 'कॅड' आर्थिक वर्षाच्या आधीच्या तिमाहीत १६.७ अब्ज डॉलर (जीडीपीच्या १.८ टक्के) वरून कमी झाला आहे.

भारताची चालू खात्यातील तूट (कॅड) २०२४-२५ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये ११.५ अब्ज अमेरिकन डॉलर (जीडीपीच्या १.१ टक्के) वरून २०२३-२४ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये १०.४ अब्ज डॉलर (जीडीपीच्या १.१ टक्के) पर्यंत वाढली. २०२४-२५ च्या ऑक्टोबर-डिसेंबर कालावधीत व्यापारी व्यापार तूट ७१.६ अब्ज डॉलरवरून वाढून ७१.६ अब्ज डॉलर झाली आहे. प्रामुख्याने उच्च व्यापारी व्यापार तूटमुळे 'कॅड' एप्रिल-डिसेंबर २०२४ या कालावधीत ३७ अब्ज डॉलर (जीडीपीच्या १.३ टक्के) पर्यंत वाढला आहे, जो गेल्या वर्षीच्या याच कालावधीत ३०.६ अब्ज डॉलर (जीडीपीच्या १.१ टक्के) होता, असे भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) ने म्हटले आहे.

### दोन्ही बँकांसाठी 'दृष्टिकोन' स्थिर

## फिचचा एसबीआय, कॅनरा बँकेला 'बीबीबी' पतदर्जा

**नवी दिल्ली/मुंबई**

फिच रेटिंग्सने शुक्रवारी देशातील सर्वात मोठी बँक असलेली स्टेट बँक ऑफ इंडिया आणि कॅनरा बँकेच्या 'बीबीबी' पतदर्जा दिला. तसेच दोन्ही बँकांसाठी 'स्थिर' दृष्टिकोन ठेवला आहे. एसबीआयचे रेटिंग फिचचे मत प्रतिबिंबित करते की जर गरज असेल तर एसबीआय या सरकारी बँकेला भारतीय बँकांमध्ये असाधारण सरकारी समर्थनाची सर्वाधिक शक्यता आहे.




### पुढील २ वर्षांत एसबीआयचा नफा सामान्य होण्याची शक्यता

निव्वळ व्याजावरील नफा आणि वाढत्या पत खर्चावरील दबाव यांमुळे पुढील दोन वर्षांत एसबीआयचा नफा सामान्य होण्याची शक्यता आहे, असे फिचने म्हटले आहे. एप्रिल–डिसेंबर कालावधीत ११ टक्क्यांपर्यंत वाढल्यानंतर आर्थिक वर्ष २५ मध्ये बँकेचे सामाईक इक्विटी टियर–I भांडवल आणखी २५ आधार अंकांनी वाढण्याची अपेक्षा आहे, असे रेटिंग एजन्सीने म्हटले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २५ फेब्रुवारी रोजी नोव्हेंबर २०२३ पूर्वीच्या स्तरांवर बँकांच्या बिगर–बँक कर्जदारांच्या 'एक्सपोजर'वर लागू होणारे जोखीम वजन पुनर्संचयित केले. १६ नोव्हेंबर २०२३ रोजी, मध्यवर्ती बँकेने मजबूत क्रेडिट वाढीवर असुरक्षित वैयक्तिक कर्जासह काही कर्ज विभागांमध्ये जोखीम वाढवले होते. जोखीम वजनात २५–टक्के वाढ १ एप्रिलपासून प्रभावी असताना, ग्राहक कर्जाच्या स्वरूपातील मायक्रोफायनान्स कर्जासाठी जोखीम वजन १२५ टक्क्यांवरून १०० टक्के कमी करण्याचा मध्यवर्ती बँकेचा निर्णय तत्काळ प्रभावी झाला. जोखीम घेणाऱ्या कर्जदारांना मोठ्या प्रमाणात कर्ज दिल्यामुळे दोन्ही बँकांमधील प्रशासन कमी विकसित असल्याचे फिचचे म्हणणे आहे.

पतमापन संस्थेने भारताच्या मजबूत मध्यम-मुदतीच्या वाढीच्या क्षमतेची नोंद दोन्ही बँकांच्या वाढीसाठी पोषक वातावरण म्हणून केली आहे. २०२४-२५ (एप्रिल-मार्च) आणि आर्थिक वर्ष २६ मध्ये भारताच्या जीडीपी वाढीचा अंदाज ६ टक्क्यांपेक्षा जास्त असेल, असे सांगत फिचने म्हटले आहे की, ते भारतीय बँकांच्या क्षमतेला मध्यम कालावधीत फायदेशीर राहण्यास मदत करेल.

एसबीआयकडे इतर सरकारी बँकांच्या तुलनेत चांगले जोखीम व्यवस्थापन आहे, परंतु सरकारचा प्रभाव तिच्या पारंपरिक व्यवसाय मॉडेलवर आणि जोखमीवर पडू शकतो, असे फिच म्हणाले. सरकारी मालकीच्या बँकांवरील सरकारच्या प्रभावामुळे कॅनरा बँकेच्या जोखमीवरही परिणाम होऊ शकतो.

फिचने कॅनरा बँकेच्या मालमत्तेच्या गुणवत्तेचा दृष्टिकोन सुधारित केला आहे आणि ते स्थिर ते सकारात्मक आहे. डिसेंबर अखेरीस, कॅनरा बँकेचे सकल नॉन-परफॉर्मिंग मालमत्ता प्रमाण एका तिमाहीपूर्वी ३.७३ टक्के आणि एका वर्षापूर्वी ४.३९ टक्क्यांवरून ३.३४ टक्क्यांपर्यंत घसरले.

## पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपासाचे आधारे विविध राज्यातून हरवलेले ६७ मोबाईल फोन हस्तगत केले

दैनिक युवक आधार
सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)

नवी मुंबई आयुक्तालय अंतर्गत सेंट्रल युकूपमेंट आयडेंटी रजिस्टर (CEIR) पोर्टचा प्रभावीपणे वापर करून मोबाईल चोरीचा समना करण्यासाठी तसेच गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरीता आणि मोबाईल सुरक्षा वाढविण्याकरता प्रोजेक्ट ट्रॅक गार्ड सेफ गार्ड मोबाईल इनहान्स सिक्युरिटी ऑफ मोबाईल नवी मुंबई हा प्रोजेक्ट राबविण्यात आला होता या अनुशंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई हद्दीतील सन २०२५ माहे मार्च पर्यंतचे गहाल झालेल्या मोबाईल पैकी एकूण ६७ मोबाईल CEIR पोर्टलद्वारे पनवेल शहर पोलिसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मूलमालकांना हस्तांतरण केलेबाबत मा.पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे. मा.अप्पर पोलीस आयुक्त संजय येनपुरे.मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ ०२.पनवेल प्रशांत मोहिते. मा.सहा. पोलीस आयुक्त पनवेल विभाग अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील हरवलेले मोबाईल फोन याबाबतची तक्रार नोंदवण्याकरता नागरिकांना भारत सरकार द्वारे CEIR पोर्टल सुरू करण्यात आले आहे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे. पोनि शाकीर पटेल. पोनि अभिजीत अभंग यांनी दिलेला सूचनाप्रमाणे सपोनी प्रकाश पवार.पो उपनि विनोद लभडे.सपोनि प्रकाश पवार.पोउपनि विनोद लभडे.पोहवा यशवंत झांझम.अविनाश गंथडे. नितीन वाघमारे.परेश म्हात्रे.अमोल डोईफोडे.महेंद्र वायकर.महेश पाटील. अमोल पाटील.संदेश म्हात्रे.तुषार. बोरसे.विनोद देशमुख.मिथुन भोसले. विशाल दुधे.किरण कराड. चंद्रशेखर चौधरी.वैभव शिंदे.प्रवीण पाटील. यांनी विविध राज्यातून आतापर्यंत १८ लाख ३८ हजार ३७८ रुपये किमतीचे एकूण रुपये ६७ मोबाईल हस्तगत केले आहेत तरी सदरचे हस्तगत मोबाईल हे दिनांक २७ मार्च २०२५ रोजी मोबाईलचे मूळ मालक यांना पोलीस ठाणे येथे बोलावून त्यांचे मोबाईल मा.वरिष्ठांच्या हस्ते सन्मानपूर्वक परत करण्यात आलेले आहे. मोबाईल फोन परत मिळालेल्या नागरिकांनी जनमानसातील पोलिसांची प्रतिमा उंचावल्याबाबत पोलीस ठाणेकडील सर्व अधिकारी व अंमलदार विशेष करून विशाल दुधे (तांत्रिक विश्लेषक )ह्यांनी आपले मोबाईल परत केले म्हणून मोबाईल मूळ मालकांचा आनंद द्विगणित झाला होता यावेळी पोलिसांचे विशेष आभार म्हणून कौतुक केले.



## रा.स्व.संघ जनकल्याण समिती व भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. मुंबई रिफायनरिच्या सी. एस. आर.योजने अंतर्गत दिव्यांगासाठी सहाय्यक उपकरणे वाटप

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

रा.स्व.संघ जनकल्याण समिती व भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. मुंबई रिफायनरिच्या सी. एस. आर.योजने अंतर्गत दिव्यांगासाठी सहाय्यक उपकरणे वाटप कार्यक्रम पनवेल महानगर पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात मंगेश चितळे व प्रकल्प समिती पदाधिकारी यांच्या शुभ हस्ते भारत माता प्रतिमेचे पुजान व दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख आतिथी मंगेश चितळे यांचा सत्कार संस्था अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्र यांनी केला.व्यासपीठावरील पाहुण्यांचा सत्कार संस्था कार्यवाह राजीव समेळ यांनी केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यंकटेश लामजने यांनी केले. मंगेश चितळे यांनी रुग्णालय करत असलेल्या कामांचे कौतूक केले. दिव्यांगांसाठी असणाऱ्या सरकारी योजना दिव्यांगां पर्यंत पोहचत नाहित तसेच असे बरेच दिव्यांग आहेत ज्यांची नोंदणी होत नाही. काहीजण अंथरूणावर आहेत त्यांना दिव्यांग योजनेचा फायदा मिळत नाही. पनवेल महानगर पालिका यावर काम करत आहे. रा.स्व. संघ जनकल्याण समिती व पनवेल महानगर पालिका मिळून यासाठी चागले काम करु शकू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्या नंतर रुग्णालयची माहिती प्रकल्प अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्र यांनी करुन दिली. महाराष्ट्रात चालणाऱ्या जनकल्याण समितीच्या प्रकल्पांची माहिती प्रमोद क्षिरसागर यांनी करुन दिली. विठ्ठल गाडेकर यांनी दिव्यांगांसाठी महाराष्ट्रात प्रथमच सुरु झालेल्या लातूर येथिल आय. टी.आय ची माहिती दिली. सदर प्रशिक्षण हे मोफत असून वसतिगृहाची सोय उपलब्ध आहे. या संधिचा लाभ दिव्यांगांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास संस्था अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्रे, उपाध्यक्ष डॉ.ययाती गांधी, कार्यवाह राजीव समेळ, सह कार्यवाहीका सौ.अनुराधा ओगले, रा.स्व. संघ जनकल्याण समिती प्रांत सदस्य प्रमोद क्षीरसागर रा.स्व. संघ कोकण प्रांत सह कार्यवाह शरद ओगले, रा.स्व. संघ कुलाबा जिल्हा कार्यवाह श्रीरंग काणे, रुग्णालय मुख्य संचालक व्यवस्थापक सुनील लघाटे, रुग्णालय वैद्यकीय अधिकारी डॉ.भक्ती सारंग तसेच दिव्यांग व रुग्णालय सेवक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रसन्न खेडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन राजीव समेळ यांनी करून कार्यक्रमाची सांगता झाली.



## उगांव रेल्वे स्टेशनवर पॅसेंजरला थांब्याबाबत दोन महिन्यात सकारात्मक निर्णय

दैनिक युवक आधार
निफाड प्रतिनिधी
राहुल कुलकर्णी

शिवडीच्या सरपंच संगिता सांगळे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने रेल्वे प्रशासनास साठ दिवसात सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले कोविड कालावधीत लॉकडाऊनमुळे रेल्वेसेवा बंद झाली. लॉकडाऊननंतर रेल्वे सेवा पुर्ववत झाली मात्र उगांव रेल्वे स्टेशन येथे थांबणारी इगतपुरी भुसावळ, आणि भुसावळ इगतपुरी या पॅसेंजरला उगांव रेल्वे स्टेशनला थांबा दिला गेला नाही त्यामुळे रेल्वे स्टेशन परिसरातील शिवडी, उगांव, खेडे,वनसगांव,सोनेवाडी, थेटाळे आदी भागातील नागरिक विद्यार्थी नोकरदार व्यावसायिक यांना नाशिक भुसावळ मुंबई नागपुर अशा शहरात जाणे येणेसाठी रेल्वे सुविधेअभावी अडथळा निर्माण झाला होता.उगांव रेल्वे स्टेशनवर पॅसेंजरला थांबा मिळत नसल्याने उच्च न्यायालयात शिवडीच्या सरपंच संगिता सांगळे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनवाणीदरम्यान दिले आहे. स्थानिक नागरिक व ग्रामपंचायत प्रशासनाने रेल्वे प्रशानास तसेच लोकप्रतिनिधींना निवेदने देऊन उगांव रेल्वे स्टेशला पॅसेंजर गाडीस थांबा मिळवुन देण्याची मागणी केली. उगांव रेल्वे स्टेशनला स्टेशन मास्तर व इतर कर्मचारी नियुक्त असुन एकही रेल्वेगाडी थांबत नसल्याने ग्रामस्थांची मागणी दुर्लक्षित झाली होती.उगांव रेल्वे स्टेशनवर रेल्वे गाडीस थांबा मिळणेबाबत निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही याबाबत शिवडीच्या सरपंच संगिता सांगळे यांनी मुंबई उच्च न्यायालयात अँड नारायण रोकडे, अँड अभंग सुर्यवंशी, अँड सिध्दार्थ घोडके यांचेमार्फत याचिका दाखल केली. याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान मध्य रेल्वेच्या भुसावळ मंडळाकडुन रेल्वे बोर्डास त्याबाबत प्रस्ताव प्राप्त आहे असे स्पष्ट करण्यात आले त्यावर उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती रविंद्र घुगे व न्यायमुर्ती अश्विन भोभे यांनी रेल्वे प्रशासनाने साठ दिवसात उगांव रेल्वे स्टेशनवर पॅसेंजरला थांबा देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहे.




उगांव रेल्वे स्टेशनवर पॅसेंजर अथवा कोणत्याही प्रवासी गाडीस थांबा देण्याची मागणी सतत निवेदनाद्वारे करुनही दखल घेतली गेली नाही मात्र न्यायदेवतने सामान्य नागरिक नोकरदार व्यावसायिक विद्यार्थी यांच्या मागणीला दाद दिली

**बाबुराव सानप**
**सोनेवाडी ता निफाड**